## प्रकरण पहिले

# दलित कादंबरी : स्वरूप आणि वाटचाल

प्रस्तावना

१. कादंबरी – संकल्पना

२. लघु कादंबरी – संकल्पना

३. दलित कादंबरीचे स्वरुप

    ३.१ दलित कादंबरीतील वेदना

    ३.२ दलित कादंबरीतील विद्रोह

    ३.३ दलित कादंबरीतील नकार

    ३.४ बुद्धपुरस्कृत मानवतावाद आणि दलित कादंबरी

    ३.५ दलित कादंबरीतील विज्ञाननिष्ठा

४. दलित कादंबरीतील समाजजीवन

५. दलित कादंबरीतील समाजचित्रे

    ५.१ दलित कादंबरीतील भुकेचे चित्रण

    ५.२ दलित कादंबरीतील अस्पृश्यतेचे चित्रण

    ५.३ दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा

    ५.४ दलित कादंबरीतील स्त्रीजीवन

    ५.५ दलित कादंबरीत येणारे ग्रामीण जीवन

    ५.६ दलित कादंबरीतील वातावरण

    ५.७ दलित कादंबरीतील भाषाशैली

    ५.८ दलित कादंबरीतील संघर्ष

    ५.९ दलित कादंबरीतील निवेदनपद्धती

    ५.१० दलित कादंबरीची मांडणी

६. दलित कादंबरीची वाटचाल

७. सारांश

* संदर्भसूची

## प्रकरण पहिले

## दलित कादंबरी : स्वरूप आणि वाटचाल

१९६० नंतरच्या काळात मराठी साहित्यविश्वात 'दलित साहित्य' नावाच्या झंझावती वादळाने मराठी साहित्य विश्व हालवून सोडले. अर्थात साधारणत: याच काळात जन्माला आलेल्या ग्रामीण व स्त्रीवादी साहित्यानेही आपआपल्या प्रांतात त्यांचे वेगळे अस्तित्व निर्माण कले. दलित साहित्याने जी भरारी घेतली ती या संप्रदायांना तेवढीशी जमली नाही. एकीकडे ग्रामीण साहित्य ग्रामीण माती आणि त्या मातीत राबणाऱ्या, कष्ट करणाऱ्या लोकांचे जीवन व येणाऱ्या समस्या यांच्या अनुषंगाने आपले विचार मांडण्याचा प्रयत्न करत होते तर दुसरीकडे दलित साहित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी पुलकित होऊन दलितांच्या व्यथा-वेदना व विद्रोहाचे जळजळीत शब्दांच्या आधारे लेखन करून जातिव्यवस्थेविरुद्ध बंड करून उठले होते. शतकानुशतके अंधाराच्या आणि अज्ञानाच्या खाईत सापडलेल्या दलितांना ज्ञानाचा प्रकाश दाखवून त्यांच्यातील अस्मिता जागृत करण्याचा यशस्वी प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आणि त्यांच्या विचारांनी भारावलेल्या व पेटून उठलेल्या दलित लेखकाने त्याच्या लेखणीने अखिल मराठी विश्व ढवळून काढले. कथा, कादंबरी, कविता, आत्मकथन यासारख्या वाङ्मयप्रकारांच्याधारे दलितलेखक आपल्या विचारांचे आसूड या चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेवर ओढू लागला. दलित साहित्याचा आतापर्यंतचा प्रवास पाहिला तर आपल्या असे लक्षात येते की पहिल्या पिढीची वेदना, दुसऱ्या पिढीचा विद्रोह आणि तिसऱ्या पिढीचा बुद्धपुरस्कृत मानवतावाद याप्रमाणे तो विकसित होत गेला आहे.

दलित साहित्यात ज्या वेगाने कथा, कविता, आत्मकथन या वाङ्मयप्रकारांनी भरारी घेतली आहे तेवढी कादंबरी वाङ्मयाला जमलेली नाही. सुरवातीच्या काळात आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना. रा. शेंडे या पहिल्या पिढीतील लेखकांनी आपल्या कादंबरी लेखनाद्वारे दलित व्यथा-वेदनेला वाचा फोडली खरी पण त्यानंतर या प्रकाराला फारशी गती प्राप्त झालेली दिसून येत नाही. दलित लेखकांनी आपल्या व्यथा-वेदना ज्या पद्धतीने कविता, आत्मकथनातून मांडल्या त्या पद्धतीने त्यांनी कादंबरी वाङ्मयातून मांडलेल्या नाहीत. कादंबरी लेखनाचा वेग दलित साहित्यात काहीसा मंदच आहे असे म्हणावे लागेल. पण याचा अर्थ असा नाही की या साहित्यातील कादंबऱ्या कमी दर्जाच्या अथवा महत्त्वाच्या नाहीत. बाबुराव बागुल, विजय शिरसट, हिं. गो. बनसोडे, माधव कोंडविलकर, केशव मेश्राम, अशोक व्हटकर, बाबुराव गायकवाड, बाबाराव मडावी, सुधाकर गायकवाड, मुरलीधर जाधव, योगेंद्र मेश्राम, शशिकांत तासगांवकर या दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील लेखकांच्या कादंबऱ्यांनी आपला स्वतंत्र असा ठसा मराठी साहित्यात उमटवला आहे, असे दिसून येते.

दलित कादंबरीचे स्वरूप व वाटचाल पाहण्याअगोदर प्रथम आपल्याला कादंबरी व लघुकादंबरी म्हणजे काय ते पहाणे आवश्यक आहे.

## १. कादंबरी - संकल्पना

कथा, कविता, नाटक या वाङ्मय प्रकाराला प्राचीन अशी परंपरा आहे. पण आंग्लकालाच्या सुरवातीलाच 'कादंबरी' हा नवाच वाङ्मय प्रकार मराठी साहित्याच्या प्रांगणामध्ये रुंजी घालू लागला. १८५० नंतर मराठी साहित्यात 'यमुनापर्यटन' या

कादंबरीच्या निमित्ताने पहिली कादंबरी जन्माला आली आणि मग हळूहळू या वाङ्मयप्रकाराला मराठी लेखकमनाने जवळ केले.

कादंबरीची संकल्पना पाहताना प्रथम आपल्याला 'संकल्पना' म्हणजे नक्की काय ते पहावे लागेल.

**संकल्पना :** 'Concept' म्हणजेच सर्वसाधारण कल्पना होय.

एखादा विषय आपल्याला कितपत समजला आहे याचा अंदाज घेताना वापरल्या जाणाऱ्या अनेक पायऱ्यांपैकी संकल्पना ही एक महत्त्वाची पायरी आहे.

येथे संकल्पना म्हणजेच 'स्वरूप' असेही म्हणता येईल.

**कादंबरी :**

'कादंबरी' या शब्दाचा अर्थ 'कल्पित गोष्ट' अथवा 'कहाणी' असा करण्यात येतो. इंग्रजीतील 'नॉव्हेल' वरून मराठीत 'नावल' आणि त्यानंतर त्यावरून 'कादंबरी' हे नाव पडल्याचे आपल्याला दिसून येते. का. बा. मराठे यांनी आपल्या 'नावल आणि नाटक याविषयी निबंध' यामध्ये असे म्हटले आहे की, " 'नावल' म्हणजे चमत्कारीक गोष्ट - ज्यात आश्चर्यकारक गोष्टी फार व जो वाचला असता अवलापासून अखेरपर्यंत वाचणारास जागोजागी नवल वाटावे अशा प्रकारचा जो ग्रंथ त्यास इंग्रजीत 'नावल' अशी संज्ञा आहे."[१]

बाणभट्टाच्या 'कादंबरी' नावाच्या प्रदीर्घ आख्यानावरून मराठीत या वाङ्मयप्रकारास 'कादंबरी' असे संबोधण्यात येऊ लागले. महाराष्ट्र भाषा शब्दकोश (१८२९) मध्ये कादंबरी या संज्ञेचा अर्थ 'कल्पित कथा' असा आहे.[२]

वरील विवेचनाबरोबरच आपल्याला पुढील व्याख्यांचा परामर्श घेऊन कादंबरी म्हणजे काय? ते लक्षात येईल.

**Encyclopedia Britanica** मध्ये

"The word Novel itself is ultimately from the Latin novus, meaning, 'new'via the Italian word for a whort story, novella, which tended to mean not only 'an original as opposed to at raditional story but also one that was peretenedly" [३]

कादंबरीचा उगम हा लॅटीन शब्द 'नोव्हस' म्हणजेच नवीन व इटालियन भाषेमध्ये 'नोव्हेला' म्हणजेच 'लघुकथा' की जे फक्त मुळ स्वरूपात नसून पारंपारिक कथेला छेद देते, त्याचबरोबर त्याची सुरवात नाविन्यपूर्ण असते.

**प्र. वा. बापट आणि ना. वा. गोडबोले :**

''सत्यसृष्टीच्या आधारे काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जिवित घटना यांचे गोष्टी रूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करवून जिवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मयविभाग म्हणजे कादंबरी होय.'' [४]

**कुसुमावती देशपांडे :**

''पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्वाचा किंवा अद्भूताचा मार्ग धरून मुलत: मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन, जीवनविषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री. ही वृत्ती, हा दृष्टिकोन, हा

अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या एका विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती.''[५]

**मुन्शी प्रेमचंद :**

''मैं उपन्यास को मानव-चरित्र का चित्र समजता हूँ । मानव चरित्र पर प्रकाश डालना और उसके रहस्योंका खोलना ही उपन्यास का मूल तत्त्व है । [६]

**भालचंद्र नेमाडे :**

''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे-प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत अशी साहित्यकृती.''[७]

**प्रा. रा. ग. जाधव**

''कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरुप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.''[८]

अशा प्रकारे वरील सर्व व्याख्यांचा विचार करता कादंबरी ही कथानक, व्यक्तिचित्रण, संघर्ष, मनोविश्लेषण, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, निवेदनपद्धती, अनुभव, कल्पनाशक्ती इ. घटकांच्या आधारे आकारास येते असे म्हणता येईल.

## २. लघुकादंबरी

कादंबरी वाङ्मयातील लघुकादंबरी हा एक महत्त्वाचा उपघटक आहे. खरं म्हणजे लघुकादंबरीची निर्मिती ही कादंबरी तंत्रानेच होते खरी पण तरीही कादंबरी व लघुकादंबरी यात फरकही जाणवतात.

मराठीत लघुकादंबरीस 'कादंबरीका' असेही संबोधले जाते. इंग्रजी साहित्यात Nouvella, Noveletta, Novella अशी वेगवेगळी नांवे आहेत. कादंबरीवाङ्मय प्रकारापेक्षा छोटी आणि कथेपेक्षा मोठी अशी साधारणत: १०० ते १३० पृष्ठसंख्येत संपणारी असे ढोबळमानाने तिचे स्वरूप समीक्षकांनी स्पष्ट केले आहे.

**व्याख्या :**

**डॉ. स्वाती कर्वे :**

१. ''घटना, प्रसंग यांची कार्यकारणभावाने गुंफन करुन संवाद, वातावरणनिर्मिती या घटकाच्या मदतीने मोजक्या व्यक्तिरेखांच्या जीवनाला व्यापणारा अधिकतर व्यक्तिकेंद्री असा कादंबरी-तंत्राने विकसित होणारा अनुभव; जो कथेहून मोठा व कादंबरीहून लहान असा कथात्मक लेखनप्रकार आहे, त्याला लघुकादंबरी असे म्हणता येईल.''[९]

२. ''जो अनुभव व्यक्तिगत पातळीवर अधिक रेंगाळत असतो, किंवा एका सूत्रात समूहजीवनाचे चित्र उभे करीत असतो,जो अधिक विस्तार करीत अनेक स्तरावर जात नाही, परंतु आपल्या मर्यादित परिघात एका संपूर्ण जीवनाचे चित्र उभे करीत असतो, अशा कादंबरी तंत्राने विकसित होणाऱ्या कथात्मक लेखनप्रकाराला 'लघुकादंबरी' असे म्हणतात.''[१०]

वरील व्याख्या पाहिल्यावर आपल्या असे लक्षात येते की, लघुकादंबरी ही कादंबरी वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे. दीर्घकथा व लघुकादंबरी यांच्यातही थोडाबहुत फरक हा आहेच. डॉ. भालचंद्र नेमाडे हा फरक स्पष्ट करताना म्हणतात.

''लघुकथा व दीर्घकथा हे दोन्ही प्रकार जवळचे नाते सांगणारे तर, लघुकादंबरी आणि कादंबरी हे एकत्र बसणारे प्रकार आहेत. या दोन्ही जोड्यांमध्ये रूपभेद स्पष्ट आहेत. तो पुसून टाकण्याकडे आजच्या मराठी समीक्षेचा कल आहे. कारण ही समीक्षा लघुकथेवर पोसली गेली आहे. लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा भाषिक अवकाश पुरविणारा एकसुरी आशयसूत्रात स्थलकाळाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदना देणारा प्रकार आहे. दीर्घकथेत लांबी वाढते, अवकाश वाढतो. तरी आशयसूत्रात एकसुरीच राहते. लघुकथा व दीर्घकथा या दोन्हीवर कमाल मर्यादा आहेत. लघुकादंबरीत या दोन्हीपेक्षा अवकाशाचा विस्तार तर असतोच पण आशयसूत्राचे पदर वाढतात. त्यामुळे स्थळकाळाच्या मिती वाढतात. कादंबरीत ह्या प्रमाणात आशयसुत्रे व त्यांचे पदर अनेक असतात. त्यामुळे अवकाश प्रदीर्घ व विस्तृत होतो.''[११]

वरील मताचा विचार करता असे लक्षात येते की, लघुकथा, दीर्घकथा, कादंबरी व लघुकादंबरी या वाङ्मयप्रकारांत त्यांची म्हणून काही वेगळी अशी वैशिष्ट्ये आहेत, साम्यभेद आहेत. लघुकादंबरीचा अवकाशविस्तार हा लघुकथा आणि दीर्घकथा यांच्यापेक्षा मोठा तर आहेच, पण त्याचबरोबर तिच्यातील आशयसूत्रांचे पदरही विस्तीर्ण वाटतात.

**कादंबरी आणि लघुकादंबरी यातील साम्यभेद**

एखादी दीर्घकथा आणि कादंबरी यांच्या सीमारेषेवर लघुकादंबरीच्या अस्तित्वखुणा सापडतात. कथा, दीर्घकथा, लघुकादंबरी आणि कादंबरी यांच्यात एक वैशिष्ट्यपूर्ण नाते असते ते काही साम्यतत्त्वांमुळेच. लघुकादंबरीचा विचार करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की लघुकादंबरी ही कादंबरी तंत्रानेच विकसित

होणारी कथात्म अशी कलाकृती असते. फक्त तिचा अवकाश हा कादंबरीतंत्रापेक्षा मर्यादित असतो. लघुकादंबरीतील अनुभव हा व्यक्तिकेंद्री असतो. तिचा एकूण घाट जरी कादंबरीसारखा वाटत असला तरी आशयसूत्रे, जाणिवांच्या कक्षा, अनुभव, वातावरण इ. बाबतीत लघुकादंबरी ही कादंबरीतंत्रापेक्षा वेगळी वाटते.

कादंबरी तंत्राच्या हातात हात घालून लघुकादंबरी जरी प्रवास करीत असली तरी तिचे स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण होताना दिसते. अगदी मर्यादित परिघातसुद्धा लघुकादंबरी सखोल असे चित्रण उभे करण्यात यशस्वी ठरते हे तिचे वैशिष्ट्य होय.

## ३. दलित कादंबरी : स्वरूप

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला मुक्तिलढा व दलितांना प्राप्त झालेले शिक्षण यांच्या सांस्कृतिक उपलब्धीतून निर्माण झालेले दलित साहित्य हे आज मानवी क्रांतीचे प्रतीक बनू पाहत आहे. कथा, कविता, आत्मकथन, कादंबरी आणि नाटक हे साहित्यप्रकार दलित साहित्याचा मौलिक आविष्कार म्हणून ओळखले जातात. जीवननिष्ठा हा दलित साहित्याचा एक महत्त्वपूर्ण विशेष ठरतो. त्याचबरोबर वेदना, विद्रोह, नकार, मानवता, विज्ञाननिष्ठा ही दलित साहित्याची मुलभूत वैशिष्ट्ये आहेत आणि पर्यायाने हीच दलित कादंबरीचीही वैशिष्ट्ये आहेत.

दलित कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करताना आपल्याला याच वैशिष्ट्यांचा आधार घ्यावा लागतो.

### ३.१. दलित कादंबरीतील वेदना :

''वेदना ही विद्रोहाची जननी आहे.''[११] असे डॉ. भालचंद्र फडके यांनी म्हटले आहे. दलित साहित्याचे एक अंगभूत वैशिष्ट्य म्हणून वेदनेकडे पाहिले जाते.

चोखामेळा हे दलित वेदनेचे आद्यरुप आहे. चोखामेळ्यापासून ते फुले-आंबेडकरांच्यापर्यंत उच्चवर्णीयांनी खालच्या वर्गावर केलेल्या अन्यायाचे आणि दिलेल्या वेदनेचे स्पष्टीकरण आपल्याला देता येईल. समाजव्यवस्थेमुळे, दैन्यदारिद्र्यामुळे, अस्पृश्यतेमुळे, ढोंगी रूढीपरंपरेमुळे, भोळसट कल्पनांमुळे दलितांना ज्या अनेक असह्य वेदना सहन कराव्या लागल्या, त्याचे अत्यंत विदारक चित्रण एकुणच दलित साहित्यात व पर्यायाने काहीशा कमी प्रमाणात का होईना पण दलित कादंबरीत झालेले दिसून येते.

शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी', 'मी मुक्त-मी मुक्त', 'मी माझ्या गावच्या शोधात' यांसारख्या कादंबऱ्यातून दलित वेदनेला वाचा फुटली आहे. 'काजळी रात्र', 'तांबडा दगड' या ना. रा. शेंडे यांच्या कादंबऱ्याही वेदनेचा उत्सव निर्माण करून जातात. माधव कोंडविलकरांच्या 'अजून उजाडायचं आहे,' 'अनाथ', 'हाताची कडी तोंडावर बोट' या कादंबऱ्याही दलित वेदनेचे वास्तव दर्शन घडवून जातात. भीमसेन देठे यांची 'इस्फोट', अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी', योगेंद्र मेश्राम यांची 'माझा गाव कुठाय ?' नामदेव ढसाळांची 'हाटकी हाडवाळ', अनंत घोडे यांची 'अश्रू आणि अंगार' यासारख्या कादंबऱ्यातून दलित वेदनेला वाचा फुटली आहे. वरील कादंबऱ्यातील वेदना हीच दलित साहित्याचा मूळस्त्रोत आहे. वेदनेविरुद्धचा असंतोष हा पुढे विद्रोहात रुपांतरित होतो. दलित कादंबऱ्यांनी ही वेदना वाचकापुढे मांडून बुद्धीला भावनेकडे मार्गस्थ करण्याचा चांगला प्रयत्न केला आहे.

## ३.२. दलित कादंबरीतील विद्रोह :

विद्रोह हे दलित साहित्याचे आणि पर्यायाने 'दलित साहित्यिकाचे मुख्य शस्त्र आहे. विद्रोहाचा जन्म दलित वेदनेतून झाला असून हा विद्रोह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'सम्यक' क्रांतीतून जन्माला आला आहे. हा विद्रोह स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार करणारा आहे. दलित साहित्यातून जन्माला आलेल्या विद्रोहाला सामाजिक बांधलकीचा संदर्भ आहे. हा विद्रोह केवळ भावनिक व तात्त्विक पातळीवरचा नसून तो विश्वात्मक, विज्ञाननिष्ठ व विवेकनिष्ठ आहे. ''ठोठावल्याशिवाय दरवाजे उघडत नाहीत आणि हिसकावून घेतल्याशिवाय माणुसकीचे साधे हक्कही तुमच्या हातून सुटत नाहीत.''[१३] या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्रोहनिष्ठ विचारातून त्यांची समाजविघातक चालीपरंपरांविषयीची संघर्षमय भावना आपल्या सहज लक्षात येते. मराठी दलित कादंबरीही याचेच द्योतक आहे. दलित कादंबरीतून दलित लेखकांची विद्रोहनिष्ठ विचारसरणी सहजपणे आपल्या लक्षात येते. दलित कादंबरीतील विद्रोह हा विध्वंसक नसून विध्वंसक मूल्यांविरुद्ध आहे. नीतीच्या आणि मानवतेच्या प्रस्थापनेसाठी युद्ध-प्रेरणा देणारा असा हा विद्रोह दलित कादंबरीचा विशेष अलंकार आहे.

आण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा', 'वैर', 'मास्तर' यासारख्या कादंबऱ्यातील विद्रोहाला वेदनेची किनार आहे खरी पण त्यानंतरच्या कादंबऱ्या म्हणजेच बाबुराव बागुल यांची 'सूड', केशव मेश्राम यांची 'पोखरण', माधव कोंडविलकर यांची 'छेद', आणि 'वेद', अनिरुद्ध पुनर्वसु यांची 'प्रभंजन', सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र', एकनाथ साळवे यांची 'एनकाऊंटर', बाबाराव मडावी यांची

'टाहो' तसेच बाबुराव गायकवाड यांची 'आग' या कादंबऱ्या मात्र उच्च कोटीचा विद्रोह मांडतात.

### ३.३ दलित कादंबरीतील नकार :

नकार हा दलित साहित्याचा व पर्यायाने दलित कादंबरीचा एक महत्त्वाचा विशेष आहे. हा नकार केवळ नकार नसून स्वीकारार्द नकार आहे. एक गोष्ट नाकारताना तो दुसरी गोष्ट स्वीकारतो. सामाजिक व आर्थिक विषमता, दारिद्र्य, अज्ञान, उपेक्षा, गुलामी, वर्णभेद, जातिभेद, अंधश्रद्धा या सगळ्याविरुद्ध हा नकार आहे, आणि हा नकार स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, मानवता या सर्वांना जवळ घेणारा आहे, स्वीकारणारा आहे. दलित कादंबरीतील नकार हा या चातुर्वर्ण्य व्यवस्थेला छेद देतो, आणि समतेवर आधारित अशा एक नव्या जीवनव्यवस्थेची मांडणी तो करू पाहतो.

समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करणारी नायिका 'सूड' मधून उभी करताना बाबुराव बागुल याच 'नकाराला' जवळ घेतात. हिंदू संस्कृती व अंधश्रद्धेने चिरडलेला 'नकुल' माधव कसबेंसारखे लेखक उभा करताना याच नकाराचा आश्रय घेतात. हिं.गो. बनसोडे यांची 'मुक्तिसंग्राम', उत्तम कांबळे यांची 'अस्वस्थ नायक', अशोक लोखंडे यांची 'निष्ठा' यासारख्या कादंबऱ्यातून नकाराची जाणीव स्पष्टपणे जाणवताना दिसते.

### ३.४ बुद्धपुरस्कृत मानवतावाद आणि दलित कादंबरी :

खरं म्हणजे दलित साहित्याचा संघर्षच मुळात माणसाला माणूस म्हणून न स्वीकारणाऱ्या पाखंडी प्रवृत्तीविरुद्ध आहे. दलित साहित्य हे माणसाला केंद्रबिंदू मानते. दलित साहित्य हे माणसाच्या 'मानवत्त्वाला' शिरोधार्य मानणाऱ्या एका विशाल

बौद्धिक क्रांतीतून जन्माला आले आहे, कारण या साहित्याचा पायाच मुळात भगवान बुद्धांच्या विचारसरणीवर आधारित आहे. सम्यक ज्ञान, सम्यक दृष्टी, सम्यक वाचा यासारख्या 'सम्यक' विचारांनी बुद्धांच्या विचाराला चालना दिली आहे. बुद्धांच्या या विचारातूनच महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारखे लोक प्रभावित झालेले दिसतात. बुद्धाचा हा मानवतावाद मराठी दलित कादंबरीच्या पानापानातून डोकावताना दिसतो.

हरीभाऊ पगारे यांची 'युगप्रवर्तक', मुरलीधर जाधव यांची 'कार्यकर्ता', बा. स. हाटे यांची 'युगविधान', हिं. गो. बनसोडे यांची 'मुक्तिसंग्राम', भा. द. खेर यांची 'प्रबुद्ध', यशवंत मनोहर यांची 'रमाई' यासारख्या कादंबऱ्यातून बुद्धांच्या मानवतावादी विचारसरणीचा प्रभाव जाणवतो.

### ३.५ दलित कादंबरीतील विज्ञाननिष्ठा :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इहवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. त्यांचा विज्ञानावर जबरदस्त विश्वास व तेवढीच श्रद्धा होती. विद्या, स्वाभिमान व शील हीच आंबेडकरांची तीन उपास्य दैवते होती. देव, धर्म, जात, पात, अंधश्रद्धा या गोष्टी मानवनिर्मित असून त्यांचा वास्तवाशी अथवा भौतिकाशी काहीही संबंध नाही असा त्यांचा विचार होता. ''गरीब लोकांची पिळवणूक करून धर्माच्या नावाखाली ज्यांना लुबाडायचे आहे त्यांनी ईश्वर नावाचे बुजगावणे उभे केले आहे.'' असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत हाते. याचेच प्रत्यंतर मराठी दलित कादंबरीत येताना दिसते.

दलित कादंबरीतील नायक ईश्वरी अस्तित्व नाकारताना दिसतो ते डॉ. आंबेडकरांच्या विज्ञाननिष्ठ विचारधारेच्या प्रभावामुळेच . माधव कसबे यांची 'नकुल', बाबुराव बागुल यांची 'सूड' यासारख्या कादंबऱ्यातून ईश्वरी अस्तित्व नाकारण्याचा प्रयत्न केला आहे. बळवंत कांबळे यांची देवदासीच्या जीवनावरील 'नापत' ही कादंबरी खऱ्या अर्थाने दलित कादंबरीच्या विज्ञाननिष्ठ कुळाची कादंबरी आहे. गावकुसाबाहेरची महारमांगांची वस्ती. संपूर्ण गाव इनामदारांच्या ताब्यात असलेले, अशा कठीण परिस्थितीत गाव जगत असताना जोगतीण म्हणून आलेली 'पारु' विलक्षण समाजक्रांती करण्याचे धाडस दाखविते याचे जबरदस्त वर्णन या कादंबरीत येते. हि. गो. बनसोडे यांची 'मुक्तिसंग्राम' धर्मांतरामुळे मुक्त होऊ पाहणाऱ्या माणसाच्या संग्रामाची दृकचित्रे टिपते.

वरील विवेचनाच्या आधारे आपल्याला दलित कादंबरीचे स्वरुप सांगता येते. दलित साहित्य व पर्यायाने दलित कादंबरी जिवंत करण्यात वरील स्वरुपवैशिष्ट्यांचा फार मोठा वाटा आहे.

## ४. दलित कादंबरीतील समाजजीवन :

शतकानुशतके अज्ञानाच्या आणि अंधाराच्या खाईत खितपत पडलेल्या दलित वर्गाची दु:खे हाच खऱ्या अर्थाने दलित साहित्याचा आणि पर्यायाने दलित कादंबरीचा मुख्य आशय आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मानवी मूल्यांपासून सततपणे दूर राहिलेल्या या समाजाचे दैन्य दलित कादंबरीने अतिशय उत्कट, प्रामाणिक व नेमकेपणाने चित्रित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. दलित कादंबरीने जे समाजजीवन आपल्या शब्दाशब्दातून चित्रित केले आहे ते सहृदय वाचकाला अस्वस्थ

करून सोडते. या कादंबरीतील समाज हा ''गावकुसाबाहेरचे'' वाळलेले, पिचलेले जीवन जगताना दिसतो. सामान्यत: तसे पाहिले तर या कादंबरीचा नायक हा कुणी एकटादुकटा नसतो तर ''आखिल दलित समाज आणि त्याचे दु:ख'' यालाच खऱ्या अर्थाने या कादंबरीचे नायकत्व प्राप्त होते असे म्हणावे लागेल. दलित कादंबरीच्या पहिल्या पिढीतील लेखक म्हणून प्रसिद्ध असलेले शंकरराव खरात आपल्या सर्वच कादंबऱ्यांमध्ये दलित समाजाचे दु:ख, वेदना भावनातिशयानुकुल शब्दात मांडताना दिसतात. ''हातभट्टी'' सारख्या कादंबरीतून ते गिरिजाच्या दु:खाबरोबरच तिच्या आसपासच्या झोपडपट्टीत जगणाऱ्या माणसांचे दु:खदैन्य शब्दबद्ध करतात. झोपडपट्टीमध्ये घडणारे सर्व भयानक प्रकार तपशिलासह 'हातभट्टी'तून मांडताना खरातांची लेखणी विशेष वेग घेताना दिसते. त्याचबरोबर 'फुटपाथ' मध्येही त्यांनी फुटपाथवरील निराश्रित लोकांचे दैन्य रेखाटलेले दिसून येते.

दलित साहित्यातील एक प्रतिभावंत व क्रांतिकारी लेखक असलेले आण्णा भाऊ साठे हेदेखिल आपल्या अनेक कादंबऱ्यातून दलित समाजजीवनाचे चित्रण करण्यात यशस्वी झालेले आहेत. अज्ञान, अत्याचार, दु:ख, दैन्य, दारिद्र्य, उपासमार, वासनांधता यामध्ये सडत असलेला दलित समाज हा त्यांच्या कादंबरीचा मुख्य धागा आहे. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीतील ग्रामीण जीवन व त्या अनुषंगाने येणारे दलित जीवनवास्तव हा या कादंबरीचा गाभाभूत घटक आहे. 'फकिरा' या शूर आणि निर्भिड कर्तबगार पुरुषाची एक ऐतिहासिक कथा मांडतानाच आण्णाभाऊ उपेक्षित जातीत जन्माला आलेल्या दलित मनाचे व पर्यायाने दलित समूहमनाचे दु:ख शब्दांत पकडण्यात यशस्वी झाले आहेत. दलित साहित्यातील एक ज्येष्ठ असे

विचारवंत असलेले बाबुराव बागुल आपल्या 'सूड' या कादंबरीत वेश्येची मुलगी असलेल्या जानकी नावाच्या मुलीची व्यथा मांडत असतानाच एकूण दलित स्त्रीदु:खाचे विदारक चित्रण उभे करतात. मुरळीच्या मुलींना केवळ तारुण्य असते असे मानणाऱ्या समाजाचे चित्रण बागुल अत्यंत परखड शब्दात मांडतात – 'रसूलने तिला भोगले अन् दुसऱ्या दिवसापासून तिच्याकडे गिऱ्हाईके येऊ लागली. ती नको नको म्हणत असतानाही तिची सासू, नवरा, सासरा तिच्यावर सक्ती करीत होते. तिला मारत होते. येणाऱ्या पैशावर मजा करीत होते.''[१४] यासारख्या वर्णनातून बागुल मानवी नातेसंबंध, नैतिकता, संस्कृती व त्यातील भीषणता यांचे चित्रण करतात.

केशव मेश्राम यांच्या 'पोखरण' या कादंबरीत 'जामालिन' जातीचे दु:खमय जीवन चित्रित झाले आहे. 'हकिकत' या कादंबरीत त्यांनी आपल्या गतायुष्याचे अनुभव व्यक्त केले आहेत. आर्थिक विषमता, अपमान, दारिद्र्य हे या कादंबरीचे गाभाभूत घटक आहेत. 'जटायू' मध्ये एक मांगाचा हुशार मुलगा मनात नसताना ढोंगी संस्कृतीकडून समाजाकडून कसा फसविला जातो याचे चित्रण या कादंबरीत येतेच शिवाय मांगवाड्यातील लाकांचे दारिद्र्य व अज्ञान उद्भक्त करण्याचा मेश्राम यांचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. भीमसेन देठे यांच्या 'इस्फोट' या कादंबरीमध्ये बौद्धधम्म स्वीकारानंतर दलितांच्या वाट्याला आलेले हलाखीचे जीवन चित्रित झाले आहे तर भि. शि. शिंदे यांच्या 'अमृतनाक' व 'रायनाक' या कादंबऱ्यांमध्ये सामाजिक विषमतेचे चित्रण येते. ''दिवसभर कुणब्याच्या शेतात काम करायचे. त्याच्या मोबदल्यात पदरी पडेल ते पसा-कुडवा धान्य घेऊन घरी यायचे. त्याचा भरडा मीठ-मिरचीबरोबर रांधून कसातरी घशाखाली सोडायचा अन् फाटक्या लक्तरात

झोपी जायचं. हाच मुख्य ध्येयवाद उराशी कवटाळून ह्या शे-पन्नास घरातले बापेही वागत.''[१५] यासारख्या वर्णनातनू अस्पृश्य समाजाच्या राहणीमानाचा अंदाज येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन धर्मांतर केलेल्या अस्पृश्य-दलित समाजाच्या कोंडीचे चित्रण करणारी 'निष्ठा' ही अ. श्री. लोखंडे यांची कादंबरी. या कादंबरीत धर्मांतर केलेल्या दलित समाजाचे दु:ख, दैन्य व दास्य लेखक आपल्या शब्दात मांडताना दिसतो – ''फकिरा लेका ! बुद्ध झालाय ना तुम्ही? मंग जा की त्या बुद्धापाशी. तो सोडून दील तुमची सुंदरी. लेक हो, ढोरं ओढण्याची सोडल्याती म्हणून काय तुम्ही बामण होणार काय ? अरे नीच ते नीचच राहणार हाय तुम्ही. सालेहो, कुरघोडी करताय आमावरच.''[१६] यासारख्या संवादातून लेखक दलितवर्गाच्या कोंडीचे, सवर्णांकडून मिळणाऱ्या पशूसमान वागणुकीचे वर्णन करतात.

ज्या आंबेडकरी विचारधारेतून, चळवळीतून दलित कादंबरीचा जन्म झाला त्या विचारधारेचे, चळवळीचे वर्णन व पर्यायाने दलित समाजाचे वर्णन चित्रित करणारी मुरलीधर जाधव यांची 'कार्यकर्ता' ही कादंबरी विशेष उल्लेखनीय आहे. या कादंबरीत येणारे समाजजीवन हे अत्यंत विदारक स्वरूपात मांडलेले आहे. ''आतला माणूस लवकर बाहेर पडला नाय तर लय राग येतो, येवढ्या कळा पोटात जोर करतात. आसं वाटतं आपल्याला आता चड्डीतच संडास होईल. पचका होणार आपला. संडास आवरत नाय आता. संडासच्या दाराला लाथा मारायला सुरवात होती. मग आतला शिव्या देतो. बाहेरचा लाथा मारतो. म्युनिसिपालिटीवाला मुकादत दररोज बोंबलतो. संडासची दारे कोण तोडतं म्हणून.''[१७] यासारख्या वर्णनातून फार विदारक व भयानक दु:ख लेखक येथे निदर्शनास आणतो.

बळवंत कांबळे यांची 'नापत' यासारखी कादंबरी एकूणच दलित जीवनाचे सामाजिक, आर्थिक दर्शन घडविते. बलुतेदारी पद्धतीमुळे दलितांना सामाजिक, आर्थिक दोन्हीचे सतत चटके सोसावे लागतात. गावातील गुरे-ढोरे, म्हशी मेल्याचा आनंद महारमांगाना होतो याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्याचे दैन्य-दास्य हेच होय. गरोदर स्त्रीला पौष्टिक अन्न तर सोडाच पण विष खाऊन मेलेल्या ढोराचं काळीज या कादंबरीतील आई मोठ्या ममतेने देणार असते. ती म्हणते, ''माझी गरवार सकवार पोर आलिया. ती लय आसेखोर आहे. चार काळजं तरी उकळून घालितन.''[१८] यासारख्या वर्णनातून लेखक एक भयान असे वास्तव वाचकाच्या निदर्शनास आणतो.

माधव कोंडविलकरांच्या 'छेद' या कादंबरीत दलितांच्यामधील परस्पर संघर्षाचे चित्रण येते. तर 'अजून उजाळायचं आहे' मध्ये चांभार समाजाच्या दु:ख दैन्याचे चित्रण येते. 'ढोर' या जमातीवर आधारित 'मेलेलं पाणी' ही अशोक व्हटकरांची कादंबरी विशेष उल्लेखनीय आहे. कातडी कमविण्याचा धंदा करणारा यल्लाप्पा हा 'ढोर'. त्याच्याभोवती या कादंबरीचे कथानक गुंफलेले असले तरी एकूणच ढोर, चांभार, महार या जातीतील समाजाचे दु:ख हा या कादंबरीचा विषय. ''म्हार कुठं, आपन कुठं? आपली जात लई दांडगी हाय. गळ्यात लिंग घालतो आपुन''[१९] यासारख्या संवादातून जातीजातीतील विषमतेचे वर्णन ही कादंबरी करते. सामाजिक अत्याचार, अन्याय या कादंबरीच्या पानापानात डोकावताना दिसतो. नामदेव ढसाळांच्या 'हाडकी हाडवाळ' या कादंबरीत बहिष्काराच्या शस्त्राने सवर्णांनी अस्पृश्यांना कशाप्रकारे जिवंतपणे मारून टाकले आहे याचे हृदय पिळवटणारे वर्णन येते. योगेंद्र मेश्राम यांच्या ''माझा गाव कुठाय?'' या कादंबरीत सामाजिक विषमता,

अन्याय, बौद्ध धर्माच्या दीक्षेनंतर खेड्यातील समाजजीवनावर झालेला परिणाम दाखविला आहे. गावात बांधलेल्या सार्वजनिक विहिरीवरून गावात झालेली दंगल, रक्तपात, त्यात वाघ्या शेर म्हणून गावातून पळून गेलेलं मांगाचं पोर यासारख्या घटना या कादंबरीत चित्रित होतात.

एकूणच मराठी दलित कादंबरीतील होणारे समाजजीवनाचे चित्रण हे अतिशय वास्तवपूर्ण तसेच सचित्र उभे करण्यात दलित कादंबरी यशस्वी झाली आहे. दलित समूहमनाचा एक स्वाभाविक आविष्कार म्हणूनसुद्धा दलित कादंबरीकडे पाहता येते, ते या कादंबरीत चित्रित केलेल्या समाजजीवनामुळेच. अनादीकाळापासून दलितांनी भोगलेल्या व्यथा-वेदना, दैन्य, दास्य, दारिद्र्य याच्या चित्रणाबरोबरच शिक्षणाचा स्पर्श झाल्याबरोबर केलेल्या विद्रोहाचे आणि पर्यायाने मानवतेचे व बंधुत्वाचे सर्वस्पर्शी चित्रण दलित कादंबरी करते आणि वाचकाला अस्वस्थ होण्यास भाग पाडते.

## ५. दलित कादंबरीतील समाजचित्रे

गावकुसाबाहेरचे वाळलेले, पिचलेले, मळलेले, विस्कटलेले अंधारमय जीवन जगत आलेला दलित समाज अत्यंत वाईट अवस्थेत जातिव्यवस्थेच्या खोल दरीत आजपर्यंत खितपत पडलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या मनामध्ये अस्मितेची आणि स्वाभिमानाची बीजे पेरून त्यांना आत्मबल देऊ केले. डॉ. आंबेडकरांच्या विचारधारेचा वारसा घेऊन निर्धाराने लेखणी उचलेला दलितलेखक आपल्या विचारांचे आसूड त्याच्या लेखणीतून समाजातील विघातकतेवर ओढू लागला. हे विचार त्याच्या कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथन यातून पाझरू लागले. आणि मग एका नव्या जीवनवास्तवाची जाण मराठी वाचकाला

दलित साहित्याच्या माध्यमातून होऊ लागली.

दलित कादंबरीतून वेदना, विद्रोह, मानवतावाद, सामाजिक न्याय यांचे दर्शन घडविण्याचे काम दलित कादंबरीकार करू लागला. दलित कादंबरीने प्रामुख्याने दलितांचे दु:ख, दैन्य, दास्य, दारिद्र्य टिपलेच शिवाय मानवमुक्तीची कवाडे उघडी करण्याचा यत्न हाती घेतला. वितभर पोटाचा खळगा भरण्यासाठी दिवसभर करावा लागणारा आटापिटा तर या लेखकाने मांडलाच पण त्याचबरोबर आत्मभान, आत्मशोध, आत्मसम्मान यांची जाणीव दलितांना व त्याचबरोबर मराठी साहित्यरसिकाला करून दिली. दलित कादंबरीत येणारे भूकेचे, अस्पृश्येतेचे, संघर्षाचे चित्र हा तर या कादंबऱ्यांचा जिव्हाळ्याचा विषय. समाजातील विविध स्तरातील-जातीतील लोकांचे दु:ख, समस्या यांना ठाम असे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी दलित कादंबरीने विशेष प्रयत्न केले. दलित कादंबरीत येणारा समाज हा शतकानुशतकांच्या दु:खदैन्याचा साक्षीदार आहे. त्याने जे अन्याय-अत्याचार भोगले आहेत त्याचा परिपाक या कादंबऱ्यांच्या पानापानातून पाझरताना दिसतो. अशा या दलित कादंबरीतील समाजचित्रांचे व पर्यायाने तिच्या जडणघडणीचे विस्तारपुर्वक विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

### ५.१ दलित कादंबरीतील भुकेचे चित्रण :

“ज्याच्याजवळ सांगण्यासारखे पुष्कळ असते, त्याला जर ते प्रभावीपणे सांगता आले तर त्याच्या अनुभवाचे सोने होते.”[२०] या भालचंद्र फडके यांच्या विधानाचा विचार केला तर दलित लेखकांनी जे अनुभव आपल्या लेखनातून निदर्शनास आणले आहेत त्या सर्व अनुभवांचे दलित साहित्याच्या रुपाने अस्सल सोन्यात रुपांतर

झाले आहे. या सर्व अनुभवांचा प्रभावी आविष्कार करण्याचा प्रयत्न दलित कादंबरी करीत आली आहे यात शंका नाही.

मानवी अस्तित्वाचे अन्नक्षुधा आणि कामक्षुधा हे दोन अविभाज्य घटक आहेत. त्यापैकी अन्नक्षुधा ही तर सर्वात महत्त्वाचा भाग आहे. 'भूक' या शब्दाभोवती मानवाच्या अस्तित्वाचा संघर्ष सुरू आहे. उपाशीपोटी क्रांती करणे कधीच शक्य नसते. वीतभर पोटाचा खळगा भरणे हे पृथ्वीतलावरील प्रत्येक मानवाचे मूलत: स्वभाववैशिष्ट्य आहे. चातुर्वर्ण्यसमाजव्यवस्थेमध्ये सर्वात खालच्या वर्गाला दलित-अस्पश्याला तर भुकेसाठी अक्षरश: आपले अस्तित्व गहाण ठेवण्याची वेळ या जातिभेदाच्या राक्षसाने आणली आहे. दलित कादंबरीत या भुकेचे व पर्यायाने उपासमारीचे चित्रण वास्तवतेच्या पातळीवर घडवून आणले आहे. या साहित्यातील प्रत्येक कलाकृती ही दलितांच्या दु:खदैन्याबरोबरच त्यांच्या अस्तित्वशून्य अवस्थेला स्पर्श करताना दिसते.

शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी' या कादंबरीत नान्याच्या कुटुंबाला भेडसावणाऱ्या भुकेचे चित्रण हे सहृदय वाचकाला अस्वस्थ करून सोडते. "आता घरात काय भांडं-कुंडं होतं, तोवर ते गहाण ठेवून पोटाला खाल्लं. नान्याला कामानं तंगवलं. मग ती घाणवट भांडी मोडून खाल्ली. पण ती आता कुठवर पुरणार ? शेवटी नान्याची झोपडीतली सकाळी चूलच बंद झाली. लहान पोरं गिरिजाजवळ "भाकर ! भाकर!" करीत होती. त्यावर ती मुलावर कावत होती. वैतागत होती. लहान मुलं ! पुन्हा "भाकर ! भाकर!" म्हणून म्हणताच तिचा वैताग उफाळत होता. ती मुलांना धपाधप मारत होती. मग मुलांच्या रडण्याचा-ओरडण्याचा कालवा वाढत होता.

झोपडीवरून जाता-येताना माणसंही बघत होती. ती कानावर घेऊन पुढं जात होती.''[२१] यासारख्या वर्णनातून शंकरराव खरात दलितांच्या भूक नावाच्या प्रश्नाला अधोरेखित करतात.

दलित कादंबरी भुकेचे चित्रण अत्यंत विदारकपणे वाचकाच्या-समाजाच्यासमोर उभे करते आणि त्याला अस्वस्थ होण्यास भाग पाडते.

**५.२ दलित कादंबरीतील अस्पृश्यतेचे चित्रण :**

अज्ञानाच्या, अंधाराच्या खोलखोल दरीत शतकानुशतके खितपत पडलेल्या दलित समाजाला पिढ्यानंपिढ्याच्या अस्पृश्यतेचे चटके निमुटपणे सहन करावे लागले आहेत. कपाळावर 'शूद्र' नावाचा कलंक लावून घेत दलितसमाज वरच्या वर्गाकडून होणारे अन्याय-अत्याचार सहन करत आला आहे. क्रांतीची बीजे अजूनही त्यांच्या मेंदूतील खडकावर उगवण्यास तयार नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्यातील अस्मिता जागृत केली आणि खऱ्या अर्थाने हा दलित समाज या हजारो वर्षांच्या अज्ञानाच्या निद्रेतून जागा झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रेरणेनेच तो ''अस्पृश्यतेशी आणि दास्याशी, विषमतेशी आणि दु:खाशी दलित साहित्याचे वैर आहे.''[२२] यासारखे क्रांतिविचार मांडू लागला.

गावकुसाबाहेरचे उपेक्षित जीवन जगत आलेला हा अस्पृश्य समाज चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या उतरंडीखाली चिरडून, गुदमरून गेला होता. आत्मभान, आत्मशोध यासारखे शब्द त्याच्यापासून कोसो दूर होते. उच्चवर्णीयांकडून मिळालेली अमानुष वागणुकही तो 'नशीब' या नावाखाली सहन करत आला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने आणि कृतिशील विचाराने त्यांच्यातील अस्मिता जागृत झाली



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आणि त्याने आपल्या लेखणीच्या शस्त्राने अराजक व्यवस्थेवर आसूड ओढायला सुरवात केली. दलित साहित्याने आणि पर्यायाने दलित कादंबरीने या जीवघेण्या अस्पृश्यतेचे विदारक चित्रण करायला सुरवात केली. आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना. रा. शेंडे या पहिल्या पिढीतील दलित लेखकांनी दलित वेदनेचे, अस्पृश्यतेचे चित्र मराठी वाचकाच्या निदर्शनास आणले.

केशव मेश्राम यांच्या 'हकिकत' या कादंबरीत या कादंबरीचा नायक जेव्हा मित्राच्या घरी रहायला जातो. तेव्हाचा अनुभव अस्पृश्यतेची दाहकता स्पष्ट करताना दिसतो. '' 'तसं नाही रे, पण हा गाव.....अडाणी लोक....!' त्याने वाक्य अर्ध्यावरच सोडले होते. एकदम मला काहीतरी चटकन जाणवले. अर्ध्या क्षणात डोक्यात विचारांची करवत गरकन फिरली. मी ते नाकारण्याचा खटाटोप करीत असताना बोलूनही गेलो....''बाबा रे महाराचा विटाळ तर झाला नाही ना?'' तो काहीच बोलला नाही.''[२३] यासारख्या वर्णनातून मेश्रामांनी त्यांना भोगावा लागलेला एक विदारक अनुभव मांडला आहे.

'जटायू' मध्येही मेश्राम मावजी मांग आणि हिराचे दु:ख एका प्रसंगात मांडताना असे दिसून येते की मावजीच्या घराच्या भिंतीलगतच्या कुडाचा वापर गावचे लोक लघवी करण्यासाठी करतात तेव्हा त्याच्याविरुद्ध मावजीने आवाज काढताच, ''मांगटे मस्तीला आले. मुतू नको म्हणतेत. बापाची इस्टेट लागली जशी.''[२४] यासारखी घाणेरडी भाषा वापरून त्यांच्या असहायतेचे लचके तोडत होते. यासारख्या अनेक प्रसंगातून दलित अस्पृश्येतेचे विदारक चित्र उभे करण्यात

दलित कादंबरी यशस्वी झाली आहे असे दिसून येते. माधव कोंडविलकर यांच्या 'छेद', 'वेद', 'अनाथ' इ. कादंबऱ्या, व्हटकरांची 'मेलंलं पाणी', बाबाराव मडावी यांची 'टाहो' इ. कादंबऱ्यातील दलित अस्पृश्यतेचे चित्र आपल्या डोळ्यासमोर अत्यंत ताकतीने उभे केले आहे.

**५.३ दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा**

दलित कादंबरीतील नायकाचे दु:ख हे वैयक्तिक त्याचेच नसते तर अखिल दलित समाजाचे दु:ख त्याच्या माध्यमातून अविष्कृत होते. आणि म्हणूनच दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा या आपआपल्या दु:खदैन्याच्या माध्यमातून संपूर्ण दलित समाज वाचकाच्या समोर उभा करतात. दलित कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखा ही संपूर्ण दलित दु:खाला, दैन्याला, दास्याला, अपमानाला, अन्यायाला, संघर्षाला, क्रांतीला चित्रित करण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक दलित कादंबरीकार आपल्या कादंबरीतील व्यक्तिरेखा जिवंत करण्यासाठी धडपडताना दिसतो. रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांचे दु:ख जिवंत व वास्तवतेच्या पातळीवर चित्रबद्ध करण्यासाठी दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा आपला जीव ओतताना दिसतात. समाजाच्या अत्यंत खालच्या थरातील विदारक जीवनवास्तव अधोरेखित करणे हे त्या-त्या कादंबरीतील व्यक्तिरेखेचे स्वभाव वैशिष्ट्यच आहे.

महार, मांग, चांभार, भटक्या-विमुक्त जाती-जमाती, आदिवासी इत्यादींचे दु:ख-दैन्य, कष्ट, उपासमार, अन्याय-अत्याचार त्याचबरोबर येणारा जीवनसंघर्ष दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा प्रामाणिकपणे मांडतात. ही प्रत्येक व्यक्तिरेखा 'स्व' बरोबरच समाजाचेही चित्र उभे करताना दिसते.

आण्णा भाऊंच्या कादंबरीतील शूर आणि निर्भिड कर्तबगार 'फकिरा', बाबुराव बागुल यांच्या 'सूड' मधील समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करून उठलेली 'जानकी', मेश्रामांच्या 'जटायू' मधील अस्पृश्यतेने अस्वस्थ झालेला 'अभिमन', भीमसेन देठे यांच्या 'इस्फोट' मधील जातिभेदाचे चटके खाणारा 'मधु', ना. ब. जाधव यांच्या कादंबरीतील महार जातीतील 'डॉ. अंजना', सुधाकर गायकवाड यांच्या कादंबरीतील समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोह करून उठलेला 'नागनाथ', शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी' कादंबरीतील वेदनेकडून विद्रोहाकडे वळलेला 'नान्या', ढसाळांच्या 'हाडकी हाडवाळ' मधील स्वाभिमानी 'बायजा', मुरलीधर जाधव यांच्या 'कार्यकर्ता' मधील समाजव्यवस्थेविरुद्ध झुंजणारा कार्यप्रवृत्त 'सदा', बळवंत कांबळे यांच्या 'नापत' मधील विलक्षण समाजक्रांती करण्याचे धाडस करणारी 'पारु', माधव कोंडविलकर यांच्या 'अजून उजाडायचं आहे' मधील जातिभेदाने औदासिन्य आलेला 'देवजी', 'छेद' मधील उद्विग्न 'सुधीर भंडारे', बा. स. हाटे यांच्या 'युगविधान' मधील शिक्षक असलेला 'लक्ष्मण', अशोक व्हटकरांच्या 'मेलेलं पाणी' मधील पुरोगामी विचारसरणी स्वीकारलेला 'बाबुराव', हरिभाऊ पगारे यांच्या 'कालिंदी' मधील क्रांतिकारी विचाराचा 'सदाशीव', दि. रा. वाघमारे यांच्या 'कल्लोळ' मधील भाषातज्ज्ञ प्रोफेसर असलेला 'शिवा', विजय काळे लिखित 'जागृती' मधील एम.बी.बी.एस. झालेला 'विसू', योगेंद्र मेश्राम यांच्या 'माझा गाव कुठाय?' मधील कर्तबगार व धाडसी 'बापू कांबळे', यासारख्या अनेक व्यक्तिरेखा दलित कादंबरीला वैभव निर्माण करून देण्यासाठी धडपडत असलेल्या दिसतात. म्हणूनच दलित कादंबरी दलित साहित्यात आपले वेगळे असे अस्तित्व निर्माण करण्यासाठी हातपाय हालवताना दिसते.

दलित कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा या वास्ततेच्या पातळीवर मराठी साहित्यरसिकाला जिवंत जीवनानुभूतीचे प्रत्यक्ष दर्शन घडवताना दिसतात.

### ५.४ दलित कादंबरीतील स्त्रीजीवन

शतकानुशतकाचा अन्याय-अत्याचार सहन करीत आलेल्या दलित समाजाचे दु:खदैन्य हे काळजाला पीळ पाडणारे आहे. आपले अस्तित्वच गहाण टाकून हा समाज या चातुर्वर्ण्य व्यवस्थेकडून चिरडला गेला आहे. या समाजातील दलित स्त्रीचे जीवन तर त्याहूनही बत्तर. अज्ञानाच्या खाईत आपल्या अस्तित्वाचा शोध घेणेही तिच्यासाठी अपरिचित आणि अनाकलनीय आहे. कुटुंबातील व्यक्तींकडून होणारा त्रास आणि त्याचबरोबर समाजव्यवस्थेकडून होणारा अन्याय-अत्याचार, वाईट चालीरिती या कैचीत सापडलेली स्त्री ही दलित कादंबरीत आपले वेगळे स्थान निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे. आपल्या वाट्याला आलेले दु:ख ती सर्व शक्ती एकवटून सहन करत आली आहे. डॉ. सुशीला ढगे म्हणतात, ''दलित कादंबरीतील स्त्रीपात्रे विशेष प्रभावी दाखविलेली आहेत. विशेष व्यक्तिमत्व आणि बंडखोरीचे जीवन जगणाऱ्या या स्त्रियांना परिस्थितीने बंडखोर केले आहे.''[२५] यावरून असे स्पष्ट होते की, या कादंबऱ्यांमध्ये येणाऱ्या स्त्रिया या लाचार नसून बंडखोर प्रवृत्तीच्या आहेत. भोग भोगणाऱ्या किंवा असहाय म्हणून त्या या कादंबऱ्यामध्ये येत नसून परिस्थितीवर मात करून स्वत:चे भविष्य घडवू पाहण्याची त्यांची मानसिकता अतिशय प्रगल्भ वाटते.

नामदेव ढसाळांच्या 'हाडकी हाडवाळ' मधील स्वाभिमानी 'बायजा' सखाबाबाचे प्रेत उचलायला सांगणाऱ्या गावकऱ्यांना धाडसाने तोंड देताना दिसते.

शंकरराव खरातांच्या 'हातभट्टी' मधील 'गिरिजा' शेवटपर्यंत आपल्या कुटुंबासाठी धडपडताना दिसते. 'सूड' या बाबुराव बागुलांच्या कादंबरीतील बंडखोर 'जानकी', बळवंत कांबळे यांच्या 'नापत' मधील धाडसी हृदयाची 'पारू', अ. श्री. लोखंडे यांच्या 'निष्ठा' मधील स्त्रियांमध्ये नवे तेज निर्माण करण्याचे धाडस करणारी 'शेवंता' यासारख्या अनेक स्त्रीपात्रांनी दलित कांदबरीतील स्त्रीजीवन वाचकांसमोर उभे केले आहे.

बाबुराव बागुल यांच्या 'सूड' या कादंबरीतील 'जानकी' ही तर अखिल स्त्रीदु:खाचे प्रतिनिधित्व करताना दिसते. ''गुळावर गावभराच्या माशा जशा येऊन पडाव्यात तशा तिच्यावर अनेक रंगांच्या, वयांच्या पुरूषांची झुंबड येऊन पडू लागली. तशी ती दोनवेळा जीव द्यायला तयार झाली. दोन्हीवेळा तिचे यत्न फसले. तेव्हा आलेल्या प्रत्येकाला ती आपल्याला या नरकपुरीतून सोडविण्याची विनंती करू लागली. पण कोणाला तिची दया येत नव्हती.''[२६] यासारख्या वर्णनातून एका गरीब, लाचार, असहाय स्त्रीचे दु:ख बागुल मांडतातच पण त्याचबरोबर जानकीचा वेदनेकडून विद्रोहापर्यंतचा प्रवासही अद्‌भूत ताकदीने लिहितात. या कादंबरीत ते पुढे लिहितात–
''पण एक सांगते, त्या दिवशी तुम्ही भेटला नसता माझ्या हातून खूणच खूण झाले असते. मी अतोनात पाप केले असते. कारण मला स्त्रीपण नको आहे. ते माझ्या दु:खाचं, राग–संतापाचं मूळ आहे.''[२७] जानकीच्या माध्यमातून समाजव्यवस्थेविरुद्ध बंड करून उठलेल्या बंडखोर दलित स्त्रीचे चित्र बागुलांनी किती ताकतीने उभे केले आहे याचे हे चांगले उदाहरण आहे.

दलित कादंबऱ्यांनी दलित स्त्रियांच्या समस्या, त्यांच्यावर होणारे अन्याय–

अत्याचार, त्यांची अगतिकता, मानसिक खच्चीकरण, उदासिनता, अगतिकता या सर्वांचे चित्र तर उभे केले आहेच पण त्याचबरोबर त्यांची जीवनसन्मुखताही तेवढ्याच ताकतीने मांडली आहे.

**५.५ दलित कादंबरीत येणारे ग्रामीण जीवन :**

दलित साहित्यातील बऱ्याचशा कादंबऱ्या या ग्रामीण जीवनजाणिवांच्या पार्श्वभूमीवर घडताना दिसतात. या कादंबऱ्यांना ग्रामीण जीवनवास्तवाचा स्पर्श झाल्यामुळे त्या आणखी जिवंत वाटतात. गाव, गावची संस्कृती, चालिरीती, परंपरा, सण-उत्सव, श्रद्धा-अंधश्रद्धा, ग्रामीण मानसिकता, ग्रामीण समाजव्यवस्था, बलुतेदारी-अलुतेदारी पद्धत, कृषिप्रधान जीवन या सर्वांतून दलित कादंबरी अस्तित्वात येताना दिसते. गावातील जाती-जातीतील संघर्ष, त्यातून निर्माण होणारे वाद, या सर्वांना ही कादंबरी अधोरेखित करताना दिसते.

कथानकाला गती देण्याचे, कथानक रसरशीत व ठसठशीत करण्याचे काम ग्रामीण जीवनवास्तवासह दलित कादंबरी करताना दिसते. गावकुसाबाहेरचे अस्पृश्य जीवनचित्र उभे करीत असतानाच ही कादंबरी ग्रामीण जीवनातील अनेक पैलूंना स्पर्श करत करत फुलताना दिसते :-

''असेच दिवसामागं दिवस चालले होते. सायंकाळची वेळ. गावातलं माणूस देवळापुढच्या पारावर येऊन टेकलं होतं. सरपंच पण पारावर बसला होता.
तंबाकूच्या चंच्या सुटल्या होत्या. बिड्यांचा धूर निघत होता. पारावर बसलेलं गडी, तरणी पोरं सरपंचांकडे टक लावून बघत होती.''[२८]

यासारख्या वर्णनातून गावचा पार, तिथल्या बैठकी, तेथील वादविवाद,

गमती-जमती यांचे दर्शन होते. सरपंच, ग्राम पंचायत सदस्य, गावचा शिक्षक, पोलिसपाटील, गावचा तराळ यासारख्या अनेक ग्रामीण व्यक्तिरेखांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनावर त्यांचा असलेला प्रभाव दलित कादंबरी स्पष्ट करताना दिसते.

ग्रामीण जीवन आणि कृषिनिष्ठ संस्कृती यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. हा संबंधही दलित कादंबरी उद्गुक्त करताना दिसते.

"गावाला सुगीचे दिवस आले होते. सुगी भरात आली होती. गावातलं माणूस आपल्या शेतात कामाला जात होतं. शिवारात शाळूची काढणी चालू होती. रोजगारानं काम करणारं गोर-गरीब, नाचार-दुबळे येरवाळीच तांबडं फुटायच्या आत फडक्यात भाकर बांधून कामाला जात पळत होते."[२९]

यासारख्या चित्रणातून गावाकडील सुगीचे दिवस, तेव्हा होणारी माणसांची धावपळ, शेतमजूर लोकांच्या हालअपेष्टा, दुष्काळातील जीवघेणी स्थिती यांचे दर्शन दलित कादंबरीच्या कथानकाला पुरक ठरते.

### ५.६ दलित कादंबरीतील वातावरण

कथा, कविता, नाटक, आत्मकथन त्याचबरोबर कादंबरी या सर्वच साहित्यप्रकारांमध्ये वातावरणनिर्मितीला फार महत्त्वाचे स्थान आहे. सुसंगत वातावरणाशिवाय कोणतीच कलाकृती यशस्वी होऊ शकत नाही. कादंबरी वाङ्मयामध्ये जिवंतपणा आणून तिला प्रभावी करण्यासाठी वातावरणाची फार मोठी भूमिका असते. कादंबरीतील प्रसंग किंवा व्यक्ती यांच्या विकासासाठी एका विशिष्ट पार्श्वभूमीवर योग्य वातावरणाची अत्यंत आवश्यकता असते." कोणत्याही विशिष्ट भूप्रदेशात, विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटना, प्रसंग घडत असतात. हे स्थळाचे-

काळाचे उचित दर्शन घडविणे म्हणजेच वातावरणनिर्मिती होय.''[३०] कादंबरीच्या कथानकातील विविध प्रसंग, घटना यामध्ये असणारे परस्परसंबंध हे वातावरणावरच खऱ्या अर्थाने अवलंबून असतात. वातावरणातील स्थळ, काळ, परिस्थिती इ. चा मानवी जीवनावर परिणाम होत असतो.

दलित कादंबरीतील वातावरणाचा विचार करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, या कादंबऱ्यातील अस्पृश्यतेचे, अज्ञानाचे, अंधश्रद्धेचे, अपमानाचे, चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेचे, वर्णव्यवस्थेविरुद्धच्या संघर्षाचे चित्र उभे करण्यात दलित वातावरणाचा प्रचंड मोठा हात आहे. गावकुसाबाहेरची वस्ती, झोपडपट्टी, त्यातील संघर्षमय जीवन या सर्वांचा वेध घेताना, तेथील वातावरणाला टाळता येत नाही. 'हातभट्टी' या कादंबरीतील झोपडपट्टीतील एक विदारक सत्य मांडताना शंकरराव खरात यांची लेखणी जिवंत वातावरणाची अनुभूती निर्माण करते.

''ध्या दुपारी झोपडीत बोंब उठत होती. अब्रूला तडे जात होते. पण कंप्लेट कोण करणार? प्रत्येकाला आपल्या जिवाची भिती. कधी भोकसून आतडी बाहेर पडतील याचा नेम नव्हता. झाकली मूठ ठेवून गप्प-गप्प बसत होतं. मग तिथं पोलीस कसा येणार ? चौकशी कशी करणार ? सर्जादादाच्या वरपर्यंत हप्त्याचा पाट घरपोच चालूच होता. मग अधिकारी डोळे असून आंधळे बनत होते. अशा परिस्थितीत झोपडपट्टीतलं माणूस आळ्या-किड्यासारखं सडत होतं.''[३१] - यासारख्या वर्णनातून शंकरराव खरात, झोपडपट्टीतील दारिद्र्याशी सतत झुंजणाऱ्या एका दलित कुटुंबाची व्यथा मांडतात. ही व्यथा मांडतानाच तेथील किळसवाणे वातावरण, गुंडागर्दी, अगतिकता खरात सचित्र उभी करतात :-

"मधेच त्या वाहत्या गटारातून डुकराची पिल्लं मुसमुसत पुढं येत होती. त्यांना पाहून लहान पोरं हुरळली. त्यांनी पिलांवर बदाबद दगड घातलं. व ती पिल्लं राडउधळत रानोमाळ झोपड्यात पळत सुटली."[३२]

असे हे झोपडपट्टीतील विदारक चित्र उभे करून खरात एका जीवघेण्या जीवनवास्तवाचा ठाव घेतात ते या वातावरणनिर्मितीमुळेच.

**५.७ दलित कादंबरीतील भाषाशैली :**

भाषा हे मानवी मनोगत व्यक्त करण्याचे अत्यंत प्रभावी साधन आहे. भाषेच्या सहाय्यानेच मानव आपल्या भावनांना अभिव्यक्त करीत असतो. मानवाच्या उत्क्रांतीमध्ये भाषेचे ऋण फार मोठे आहे. कोणताही साहित्यिक भाषेद्वारेच आपल्या लेखनप्रतिभेचे सामर्थ्य वाढविण्यासाठी झटत असतो. "यादृच्छिक ध्वनिसंकेतावर आधारलेली आणि समाजव्यवहारास सहाय्यभूत अशी पद्धती." [३३] असलेल्या भाषेचा आधार तो घेत असतो. "ज्या ध्वनीसंकेतांचा पद्धतशीर वापर करून प्रत्येक व्यक्ती व्यवहारात भाग घेते, असे व्यवहारक्षम संकेत म्हणजेच भाषा होय."[३४] अशी ना. गो. कालेलकर यांनी भाषेची व्याख्या केलेली आहे. भाषेमुळेच आशयगर्भ साहित्याची निर्मिती होत असते.

भाषेचा प्रभावी वापर करतानाच साहित्यिक हा विशिष्ट शैलीच्याद्वारे आपल्या प्रतिभेला आविष्कृत करीत असतो. भाषेबरोबरच शैलीला देखिल साहित्यामध्ये फार मोठे स्थान आहे. प्रत्येक लेखकाची स्वत:ची अशी विशिष्ट शैली असते. तिच्या अनुषंगानेच लेखक आपल्याला आलेल्या अनुभवमिश्रीत प्रतिभेतून नवनवे साहित्यप्रकार जन्माला घालत असतो. "एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट

रूपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्चयाची पद्धती म्हणजे शैली होय.''[३५] असे भालचंद्र नेमाडे म्हणतात तर ''शैली म्हणजे आविष्काराच्या संभाव्य पर्यायाची पर्यायांतर्गत निवड.'' [३६] त्याचबरोबर ''शैली म्हणजे लेखकाच्या व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा संच.''[३७] अशा दोन विचारधारा डॉ. दिलीप धोंगडे यांनी शैलीबाबत मांडल्या आहेत.

वरील व्याख्यांचा विचार केल्यावर आपल्या असे लक्षात येते की भाषा आणि शैली यांच्या हाताला धरूनच लेखकाला नवनिर्मितीची कवाडे उघडी करावी लागतात.

दलित कादंबरीतील भाषाशैलीचा विचार केला तर असे दिसून यते की प्रमाणभाषा व बोलीभाषा याबरोबरच या कादंबऱ्यांमध्ये येणारी भाषा ही 'गावकुसाबाहेर' बोलली जाणारी भाषा आहे. महारी भाषा, भटक्या-विमुक्तांची भाषा, आदिवासी भाषा यासारखे भाषेचे पदर अनेक दलित कलाकृतींमधून दिसून येतात. अज्ञानाच्या प्रचंड मोठ्या अंधकारात चाचपडणाऱ्या दलितांची भाषा ही दलित कादंबरीला विशिष्ट उंचीवर पोहचवते. या कादंबऱ्यामधील भाषेला एक विशिष्ट अशी लय आहे. तिचे म्हणून स्वत:चे सौंदर्य आहे.

''मोर्चा मॅकिनिकी चौकात येतुया. मोर्च्यात रंग भरतुया. तिथं अजून दोन-तीनशे माणसं सामील होत्याती. मोर्चा आता विराट होतुया. घोषणा बुलंद होत्याती. आवाज शहर गाजवितो. हजारो अश्वांनी दाटून रणांगणावर खूर उधळावेत वा किंकाळून पुढचे दोन्ही पाय हवेत उधळावेत, अगदी त्याप्रमाणे मोर्चा नव्या पेठेत घुसतुया.''[३८]

वरील भाषाशैलीचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते की, जर महारी बोलीचा प्रभावी वापर केला तर एखादा प्रसंग अत्यंत ताकतीने कशाप्रकारे उभा करता येतो आणि त्या प्रसंगाला जिवंत करणे कसे शक्य आहे हे होय.

दलित कादंबरीत येणारी उद्वेगाची, आवेशाची भाषा हे तर या दलित साहित्याचे फार मोठे वैभव आहे. दैनंदिन जीवनातील घटनाप्रसंग, ग्रामीण लय, शिवराळपणा यांच्या माध्यमातून दलित कादंबरी आपले दु:खदैन्य, अपमान, अन्याय-अत्याचार, संघर्ष यांचे सचित्र वर्णन वाचकास करून देते. माधव कोंडविलकर यांच्या 'अनाथ' मधील नायक आपला संताप व्यक्त करताना जे बोलतो त्यातून दलित कादंबरीतील भाषाशैलीचा उद्वेग प्रत्ययास येतो, तो म्हणतो, ''सोन्याभाऊ तुम्ही पाहिलत ना ! भैंचोद - रात्रंदिवस त्या खाटल्यावर बसून असतो. जरा कसलं काम करीत नाही. साली रांडपण मिळाली ती तसलीच. आणि आठ-आठ तास गांढ घासतोय तरी आमचं भागत नाही. आणि हा भैंचोद दिवसभर खाटल्यावर बसून दादागिरी करतो.''[३९] वरील विधानात आलेली चीड, संताप लेखकाने जशीच्या तशी वाचकांसमोर मांडली आहे. आणि म्हणूनच ती प्रभावी ठरली आहे.

### ५.८ दलित कादंबरीतील संघर्ष

संघर्ष हा दलित साहित्याचा पाया आहे. संघर्षशील प्रवृत्तीतूनच दलित साहित्याचा जन्म झाला आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला ''शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा.'' हा मूलमंत्र जपत दलित साहित्याने संघर्षशील भूमिका स्वीकारली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कृतिशील विचारांनी दलितांमध्ये संघर्षाची बीजे पेरली आणि खऱ्या अर्थाने

दलितमन संघर्ष करायला प्रवृत्त झाले. चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेची उतरंड फोडल्याखेरीज आपला विकास होणे शक्य नाही, याची जाणीव या दलितमनाला आहे. ही वर्णव्यवस्थेची उतरंड संघर्षाशिवाय नष्ट करणे कधीच शक्य नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला मुक्तिलढा आणि दलितांना प्राप्त झालेले शिक्षण यांच्या सांस्कृतिक उपलब्धीतून दलित साहित्याची निर्मिती झाली आहे. अविद्येने सर्वकाळ ग्रासलेल्या दलिताला शिक्षणाची प्रेरणा प्राप्त झाली तेव्हा त्याच्यातील प्रतिभेने त्याने सवर्ण समाजाला अनभिज्ञ असलेल्या दु:खदैन्याला चव्हाट्यावर आणले. आणि 'गावकुसाबाहेरचे' औदासिन्याने ग्रासलेले जीवन अतिशय उत्कटतेने आणि उद्वेगाने त्याने दलित साहित्यातून मांडले. हे सर्व शक्य झाले हे त्याच्यातील संघर्षशील वृत्तीमुळेच.

दलित साहित्याचे संघर्ष हे अतिशय प्रभावी आणि महत्त्वाचे शस्त्र आहे. या शस्त्राच्या आधारेच त्याने जातियतेच्या अराजक राक्षसावर घणाघाती प्रहार करायला सुरवात केली आहे.दलित कादंबरीच्या पानापानामध्ये डोकावणारा संघर्ष हा या साहित्यप्रकाराला वेगळ्या उंचीवर घेऊन जाताना दिसतो. सवर्णांकडून होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार, शिव्याशाप, अमानुष वागणूक, अमानवी कृत्ये यांचे यथासार दर्शन दलित कादंबरी करताना दिसते. 'हकिकत आणि जटायू', 'सूड', 'शूद्र', 'हातभट्टी', 'कुस्ती', 'हाटकी हाडवाळ', 'तप्तमुद्रा', 'आंदोलन' यासारख्या अनेक कादंबऱ्यांतून संघर्षाच्या ठिणग्या उडताना दिसतात. दलित कादंबरीतील नायक हा चतुर्वर्ण्य व्यवस्थेने दिलेल्या अमानुष वर्तणुकीचा सामना संघर्षशील विचारसरणीने करताना दिसतो.

सदा कऱ्हाडे यांच्या 'तप्तमुद्रा' कादंबरीतील एक प्रसंग दलित कादंबरीतील संघर्षशील विचारधारा अधोरेखित करताना दिसतो. यातील हरिश्चंद्र हा जेव्हा जातीचा रकाना रिकामा ठेवतो तेव्हा –

''क्लार्कने विचारले की, 'फॉर्म पूर्ण का भरला नाही?' हरिश्चंद्रने त्वरित उत्तर दिले, ''प्रवेशपत्रात धर्म आणि जाती याविषयी माहिती विचारली आहे. मी नवबौद्ध असं लिहिलं. आणखी काय लिहायला हवं?'' क्लार्क गुरगुरतच म्हणाला, ''काय? तुला वाचता येतं ना? का नाही? तिथं लिहिलं आहे ना एस. सी., एस.टी., एनटी मगं यापैकी हवंत ते सोडून बाकी खोड.....सरळ एससी ठेव ना ? लाज वाटते का ? नवबौद्ध म्हणवून घेतलं तरी मुळचा महारच ना?..... मग तिथं लिही हिंदू-महार.''

''मी हिंदूही नाही अन् महारही नाही. मी नवबौद्ध आहे तेवढं लिहिलं.'' ''हे बघ, उगीच वाद घालत बसू नकोस. मला दुसऱ्यांचेही फॉर्म्स बघायचे आहेत. तिथं हिंदू-महार लिहिणं आवश्यक आहे.''

''मला आवश्यक वाटत नाही.''

''मग अपूर्ण भरलेला फॉर्म मी घेणार नाही.'' क्लार्कने सांगितले.''[४०]

यासारख्या वर्णनातून सदा कऱ्हाडे यांनी दलित नायकातील आत्मभान आणि आत्मशोधाबरोबरच एक संघर्षमय विचारधारेला वाचकांसमोर उपस्थित केले आहे.

दलित कादंबरीतील संघर्ष हा समाजातील प्रतिगामी विचारसरणीविरुद्ध पुकारलेले बंड आहे. या संघर्षाला सम्यक ज्ञान, सम्यक दृष्टी, सम्यक विचारांची जोड तर आहेच पण त्याचबरोबर विद्रोहनिष्ठ विचारसरणीची साथ देखिल आहे.

### ५.९ दलित कादंबरीतील निवेदनपद्धती :

अतिशय उत्कट आणि सामाजिकतेला स्पर्श करणारी दलित कादंबरीची निवेदनपद्धती हे या कादंबरीचा महत्त्वाचा विशेष आहे. या कादंबरीने दलितांबरोबरच सवर्ण, उच्चवर्णीय, दरिद्री आणि सधन यासर्वच क्षेत्राला हात घातला आहे. आणि म्हणूनच ती उत्कृष्ठ सामाजिक कादंबरी आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वास्तवाला स्पर्श करणारे दलित कादंबरीतील निवेदन हे इतर कादंबऱ्यांपेक्षा वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. व्यक्तिगत अनुभवातून सामुहिक जाणिवेचा वैचारिक सार अत्यंत प्रभावीपणे ही कादंबरी आपल्या निवेदनातून व्यक्त करते. आपल्या स्वानुभवाच्याधारे एक भीषण वास्तव मांडताना दलित कादंबरीकार कुठल्याही तंत्रात किंवा शैलीत अडकून पडताना दिसत नाहीत. जे आहे.... जसे आहे तसे उद्गुक्त करण्याचा त्याचा मानस वैचारिक कक्षेच्या पलिकडे जाऊन एक वेगळे विश्व रंगवण्यात दंग होताना दिसतो.

वास्तववादी निवेदनद्धतीतून हा लेखक आपल्या अनुभवाच्या शिंपल्यातून प्रखर जीवनवादाचे आणि ध्येयवादाचे मोती बाहेर काढताना दिसतो. स्वत:च्या आशयाशी सुसंगत अशी नवी तंत्रे आणि शैली वापरुन हा लेखक मानवी जीवनातील भीषण वास्तव कादंबरीच्या पटावर रंगवताना दिसतो. आणि म्हणूनच दलित कादंबरीतील निवेदनाला भावनेचा उद्वेग आणि आवेश प्राप्त होताना दिसतो.दलित कादंबरीत आलेले निवेदन हे सरळ, साधे, कुठलेही तंत्र न स्वीकारता केलेले, बहुतेक दृश्यात्मक आणि वास्तवदर्शी अनुभवांचे प्रांजळ असे निवेदन आहे. या कादंबरीचा लेखक हा त्यातील पात्रांशी समरस होऊन निवेदन करताना दिसतो. आशयसूत्रे,

पात्रे, प्रसंग, तंत्र, भाषा याचबरोबर निवेदनपद्धती हेदेखिल दलित कादंबरीच्या सामाजिक आशयाला समृद्ध करण्यासाठी झटताना दिसते.

### ५.१० दलित कादंबरीची मांडणी

समाजप्रबोधनासाठी प्रभावी असा वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीकडे पाहिले जाते. त्यामुळे कादंबरीची जडणघडण, मांडणी किंवा रचना हा अत्यंत महत्त्वाचा असा भाग आहे. वाचकाच्या मनात जागृती निर्माण करून त्याची उत्कंठा वाढविणे हे कादंबरीचे प्रमुख विशेष होय. त्यामुळेच कादंबरीची मांडणी सहजसुंदर होणे आवश्यक असते. दलित कादंबरीचा विचार करता आपल्या एक गोष्ट सहज लक्षात येते की या कादंबरीला सामाजिक पार्श्वभूमी असते. वेगवेगळ्या जीवनजाणिवांना तिने स्पर्श केलेला असतो. दृश्यात्मक पद्धतीने निवेदन करून एखादा प्रसंग जिवंत करणे हे तिचे स्वभाववैशिष्ट्य आहे.

दलित कादंबरीची भूमिका ही एखाद्या आदर्श शिक्षकाची किंवा सूत्रधाराची असते. निरनिराळे प्रसंग वाचकाच्यासमोर उभे करण्यात त्याची हातोटी असते. प्रसंगानुरुप पात्रनिर्मिती करून लेखक कादंबरीचे विश्व उभे करीत असतो. व्यक्तिचित्रण त्याचबरोबर त्यांच्यातील मानसिक द्वंद्व टिपून वाचकाला उद्विग्न करून सोडणे आणि त्याचे अनुभवविश्व समृद्ध करून देणे हे दलित कादंबरीचे स्वभाववैशिष्ट्य आहे.

म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमांचा सहजसुंदर वापर इ. नी ही कादंबरी नटलेली आहे. एक वेगळे विश्व वाचकासमोर उभे करत असताना नेहमीच्या जीवनातील साधेसाधे अनुभवही या कादंबरीला समृद्ध करताना दिसतात. शंकरराव खरात, आण्णा भाऊ साठे, केशव मेश्राम, बाबुराव बागुल, योगेंद्र मेश्राम, अशोक व्हटकर, सुधाकर

गायकवाड यासारखे अनेक दलित कादंबरीकार आपल्या कादंबऱ्यांची कधी दृश्यात्मक पद्धतीने, कधी पात्रमुखी निवेदनातून, कधी मनोविश्लेषणात्मक पद्धतीतून रचना करताना दिसतात.

दलित साहित्यातील कथा, कविता, नाटक, आत्मकथन याचबरोबर कादंबरी वाङ्मयाला उज्ज्वल भविष्य मिळवून देण्यासाठी दलित कादंबरीकार रक्तलांछित वेदनांचा आक्रोश पाठीशी घेऊन आपली प्रतिभा समृद्ध करताना दिसतात. वेदना, विद्रोह, बुद्धपुरस्कृत मानवतावाद, आत्मभान, आत्मशोध, बांधिलकी, स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय इ. चा स्वाभाविक आविष्कार दलित कादंबरी अत्यंत निष्ठेने करताना दिसते.

## ६. दलित कादंबरीची वाटचाल

दलित साहित्याचा निर्मितीकाळ हा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातील मानला जातो. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून हा काळ जसा विलक्षण मानला जातो तसाच तो साहित्यनिर्मितीच्याबाबतही मानला जातो. स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक घटना-प्रसंगानी मराठी साहित्यात खळबळ निर्माण केली. याच काळात उदयास आलेल्या दलित साहित्याइतकी खळबळ मराठी साहित्यात दुसऱ्या कोणत्या साहित्यप्रकाराने निर्माण केल्याचे निदर्शनास येत नाही. या साहित्यनिर्मितीच्यामागे एक प्रचंड सामाजिक-सांस्कृतिक स्फोट आहे. दलित साहित्य हे खऱ्या अर्थाने मानवी जीवनजाणिवांची वास्तवता दर्शविते.

मराठी दलित कादंबरीचा विचार करता ही कादंबरी सुरवातीच्या काळातील सामाजिक जडणघडणीचा आविष्कार करण्याचा प्रयत्न करताना दिसते. सामाजिक

समता, आंबेडकरी चळवळ, धार्मिक परिवर्तन, दलितांच्या हक्काची जाणीव, मंदिरप्रवेश, मानवमुक्ती, गुलामगिरीतून मुक्तता, मार्क्सवादी विचारसरणी, इ. विषयांचा आधार घेऊन ही कादंबरी सुरवातीच्या काळात फुलताना दिसते. दलितांना अपमानित करणाऱ्या संस्कृतीचा नायनाट करण्याकरिता कथा, कविता, नाटक, आत्मकथन व कादंबरी या शस्त्रांचा वापर दलितलेखक निर्भयपणे करू लागला आहे. कविता व आत्मकथन यांच्याइतके नसेनाका पण काही प्रमाणात तरी दलित कादंबरीने दलित साहित्यात नव्या जीवनजाणिवा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक संघर्ष व विद्रोह नव्यानेच या कादंबरीत त्या काळात अवतरू लागला. दलित–अस्पृश्य यांच्या कोंडलेल्या मनाचा एक भावनिक स्फोट या दलित कादंबरीतून त्या काळात दिसू लागला होता. मध्यमवर्गीय जीवन दलितांच्या वाट्याला कधीच आले नाही. त्यामुळे दलित साहित्यातील व पर्यायाने दलित कादंबरीतील 'दलित' हा केवळ कुटुंबापुरता, एका व्यक्तीपुरता या साहित्यात आला नसून सामुहिक भावना घेऊन तो अवतरला आहे. त्याला सामाजिक जाणिवेची धार प्राप्त झाली. सामाजिक, सांस्कृतिक जीवन हे दलित–अस्पृश्यांच्या वाट्याला कधीच आले नाही हे दलित लेखकांना कादंबरीतून व्यक्त करायचे होते. या लेखकांना दलित कादंबरीत समाजाच्या दु:खांना वाङ्मयीन स्वरून प्राप्त करून द्यायचे होते. दलितांच्या वेदना, विद्रोह, नकार, बांधिलकी, सामाजिक न्याय, मानवता, स्वातंत्र्य, समता यांना या दलित कादंबरीने न्याय देण्याचा प्रयत्न या सुरवातीच्या काळात झाला. या दलित कादंबरीने संपूर्ण दलित उपेक्षितांचे अंतरंग आपल्या कादंबरीचे विषयस्थान बनविले. दलितांच्या बोलीभाषेचा वापर करून ही कादंबरी आकार घेऊ लागली.

स्वातंत्र्योत्तर काळातील दलित कादंबरीची वाटचाल पाहताना आपल्याला त्या-त्या काळातील दलित कादंबरीकारांच्या कलाकृतींचा विचार करावा लागेल. पहिल्या पिढीतील दलित लेखकांचा विचार करताना आपल्याला आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, ना. रा. शेंडे यांच्या साहित्यकृतींचा परामर्श घेणे महत्त्वाचे ठरेल. त्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील लेखकांचाही विचार करणे महत्त्वाचे आहे.

मराठी साहित्यसृष्टीमध्ये राजमान्यता मिळविलेले एक आघाडीचे लेखक म्हणून आण्णा भाऊ साठे यांचा उल्लेख करावा लागेल. शाहिरी बाणा रोमारोमात भिनलेला हा दलित लेखक कथा, कादंबरीच्या प्रांतातून दलितांच्या जीवनाचे अनेक पैलू उलघडून दाखवू लागला. साधारणत: १९५१ पासून त्यांनी कादंबरी लेखनाला प्रारंभ केला. त्यांनी एकूण ३० कादंबऱ्या लिहिल्या. 'वारणेच्या खोऱ्यात', 'चित्रा', 'फकिरा', 'वैजयंता', 'अलगुज', 'माकडीचा माळ', 'चंदन', 'वैर', 'गुलाम', 'डोळे मोडित राधा चाले', 'चिखलातले कमळ', 'वारणेचा वाघ', 'आघात', 'मास्तर', 'पाझर', 'संघर्ष', 'आवडी', 'केवड्याचे कणीस', 'रानबोका', 'अग्निदिव्य' यासारख्या त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठी रसिकमनाला मोहित करून सोडले होते. त्यांच्या कादंबऱ्यांतून समाजवास्तव, गुलामगिरी, अंधश्रद्धा, अन्याय, अत्याचार वाचकाच्या डोळ्यासमोर उभा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

आण्णा भाऊ साठे यांच्या पावलावर पाऊल टाकतच शंकरराव खरात यांनीही दलित कादंबरीच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. 'हातभट्टी', 'गावचा टिनोपाल गुरुजी', 'मी मुक्त-मी मुक्त', 'झोपडपट्टी', 'मसालेदार गेस्ट हाऊस',

'फुटपाथ', 'टाऊथ', 'पारधी', 'मी माझ्या गावाच्या शोधात', 'पोतराज', 'माणुसकीची हाक' इ. विपुल कादंबऱ्यांतून खरातांनी आर्थिक कोंडी, दारिद्र्य, भ्रष्टाचार, बेईमानी अशा प्रकारचे विषय घेऊन सामाजिक वास्तवाची जाण तेवत ठेवली. दबलेले आणि दडपलेले जीवन समाजापुढे आणून त्यांच्या आवाजात आत्माभिमान जागृत करण्याची शक्ती खरात निर्माण करतात. त्याचबरोबर दलित वेदनेला आपल्या कादंबरीतून व्यासपीठ मिळवून देतात. खरातांच्या बरोबरीनेच लिखाण करणाऱ्या लेखकांत बाबुराव बागुलांचे नाव अग्रणी ठरते. 'सूड', 'अघोरी', 'पावशा', 'मूकनायक', 'सरदार', 'भूमिहीन' इ. कादंबऱ्या त्यांची त्यांच्या प्रतिभेने आविष्कृत केल्या. दलित साहित्यातील एक श्रेष्ठ विचारवंत अशी बागुलांची ख्याती होती. 'सूड' ही त्यांच्या प्रतिभेतून जन्माला आलेली अजरामर कलाकृती. जानकीच्या माध्यमातून ही कादंबरी एक जबरदस्त भीषण वास्तव समाजाच्या समोर मांडते. लहानलहान पण परिणामकारक वाक्ये, शब्दसुचकता, अनुभवांची दाहकता यामुळे ही कादंबरी उठावदार ठरली आहे.

कथालेखक म्हणून सुपरिचित असलेले ना. रा. शेंडे यांनीही कादंबरीलेखनात पाऊल टाकले. 'काजळी रात्र', 'तांबडा दगड', 'विलासिनी', 'अन्शुजा' या त्यांच्या चार कादंबऱ्या. विषमता नष्ट व्हावी, समता प्रस्थापित व्हावी, जातिभेद साफ झुगारला जावा , समाजातील खालचा थर उन्नत व्हावा या उद्देशाने त्यांनी कादंबरी लेखन कले. केशव मेश्राम हे दलित कवितेच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव. त्यांचा प्रतिभास्पर्श कथा, कादंबरी, कविता या तीनही वाङ्मयप्रकारांना झाला आहे. 'पोखरण' आणि 'हकिकत व जटायू' या दोन महत्त्वपूर्ण कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या.



15923

केशव मेश्राम यांच्या कादंबरीचे विशेष हे त्यांच्या मूल्यसूचक डोळ्यांनी टिपलेल्या श्रम करणाऱ्या माणसाचे आहे. मेश्रामांची 'पोखरण' ही कादंबरी श्रमजिवी दलितांच्या आदिम संस्कृतीला वास्तविक व तार्किक पातळीवर चित्रबद्ध करणारी कादंबरी. 'जामलिन' या आदिम जमातीच्या लोकांचे जीवन 'पोखरण' मध्ये आले आहे. तर 'जटायू' मधून एक मांगाचा मुलगा मनात नसताना ढोंगी संस्कृतीकडून फसविला जातो, त्याचे आयुष्य उध्वस्त होते याचे चित्रण आले आहे.

भीमसेन देठे यांची 'इस्फोट' ही कादंबरी दलित जीवनाच्या वस्तुस्थितीचे वर्णन करते. धर्मांतरानंतर दलित तरूणाच्या समाजाकडून झालेल्या अपमानित मनाची अवस्था 'इस्फोट' मध्ये त्यांनी चित्रित केली आहे. त्याचबरोबर भि. शि. शिंदे यांच्या 'अमृतनाक' व 'रायनाक' या कादंबऱ्याही उल्लेखनीय ठरल्या आहेत. ना. ब. जाधव यांच्या 'डॉ. अंजना', 'अपर्णा', 'राजाभाऊ' ' दे दान सुटे गिराण', 'सुटका' या कादंबऱ्याही उत्तम जमून आल्या आहेत. दलितांच्या मुक्तिसंग्रामाचे नेते आणि दलित साहित्याचे प्रेरणास्थान म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! त्यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न हरिभाऊ पगारे यांनी आपल्या 'युगप्रवर्तक' या कादंबरीत केला आहे. सुधाकर गायकवाड यांच्यासारख्या कवी मनाचा प्रतिभावंतही कादंबरीच्या प्रांतात याच काळात मुशाफिरी करताना दिसतो. त्यांच्या 'शूद्र' या कादंबरीत भूतकाळाचे वस्तुनिष्ठ वृत्तीतून तत्त्वशोधन करण्याचा प्रयत्न दिसतो. आपल्या माथ्याला लागलेला शुद्र हा कलंक का लागावा? याचा शोध घेत निघालेल्या तरुणाच्या धडपडीचे वर्णन लेखकाने मोठ्या कौशल्याने मांडले आहे. अ. श्री. लोखंडे यांची 'निष्ठा', मुरलीधर जाधव यांची 'कार्यकर्ता', बळवंत कांबळे यांची 'नापत',

निशिकांत शेंडे यांची ‘कलंकमुक्ती’, बंधुमाधव यांची ‘रमाई’ यासारख्या कादंबऱ्यांनी दलित कादंबरीत आपली वेगळी ओळख निर्माण केली. हिं. गो. बनसोडे यांची ‘मुक्तिसंग्राम’, ‘उज्ज्वला’, माधव कोंडविलकर लिखित ‘अजून उजाडायचं आहे’, ‘छेद’, ‘वेद’, ‘निर्मळ’, ‘अनाथ’, ‘झपाटलेला’ या कादंबऱ्या बा. स. हाटे यांची ‘युगविधान’, ‘युगंधर’, अशोक व्हटकर यांची ‘मेलेलं पाणी’, नामदेव ढसाळ यांची ‘हाडकी हाडवाळ’ या कादंबऱ्याही विशेष उल्लेखनीय आहेत.

अलिकडच्या कादंबरी लेखनात दि. रा. वाघमारे यांची ‘कल्लोळ’, विजय काळे यांची ‘जागृती’, योगेंद्र मेश्राम लिखित ‘माझा गाव कुठाय?’, ‘उत्तुंग’, एकनाथ साळवे यांची ‘एनकाऊंटर’, माधव सरकुंडे यांची ‘वाडा’, बाबाराव मडावी यांची ‘टाहो’, बाबुराव गायकवाड लिखित ‘आग’, शशिकांत तासगावकर यांची ‘गरुड’ व ‘आंदोलन’ यासारख्या कादंबऱ्यांनी दलितांच्या घुसमटलेल्या मनाच्या नव्या जीवनजाणिवा साहित्यरसिकांसमोर चित्रबद्ध केल्या आहेत.

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेल्या दलित साहित्यातील कादंबरी वाङ्मयाचा प्रवास हा पहिल्या पिढीची वेदना, दुसऱ्या पिढीचा विद्रोह व तिसऱ्या पिढीचा बुद्ध पुरस्कृत मानवतावाद यासारख्या वाटावळणांनी होत आला आहे. काहीसा संथगतीने सुरू असलेला हा प्रवास दलित साहित्याच्या भविष्यकाळात मोठी झेप घेईल अशी अपेक्षा एकूणच मराठी साहित्यसृष्टीला आहे.

## ७. सारांश

विसाव्या शतकातील सांस्कृतिक संघर्षाचा महानायक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाला ओळखले जाते. त्यांनी दाखवलेल्या संघर्षशील व कृतिशील

विचारधारेच्या प्रकाशवाटेवरून चालताना दलित लेखकाने आपल्या प्रतिभेतून अनेक सुंदर अशा कलाकृतींना जन्म दिला आहे. दलित कादंबरी हा त्याचाच एक भाग होय. दलित कादंबरीने 'गावकुसाबाहेरचे' वेगळे विश्व वाचकाच्या निदर्शनास आणून दिले. त्या विश्वातील दु:ख, दारिद्र्य, यातना, विद्रोह यांचे स्फोटक चित्रण दलित कादंबरी करत आली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये दलित कादंबरीचे स्वरूप आणि वाटचाल यांचा परामर्श घेण्यात आला आहे. हे करीत असतानाच कादंबरीची संकल्पना, लघु कादंबरीची संकल्पना यांचाही थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे व त्या अनुषंगाने दलित कादंबरीचे स्वरूप व वेगळेपण टिपण्याचा प्रयत्न केला आहे. नकार, वेदना, विद्रोह, मानवतावाद, विज्ञाननिष्ठा इ. चा  दलित कादंबरीवरील प्रभाव खूपच जबरदस्त आहे. स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय या मानवी मूल्यांपासून सतत दूर राहिलेल्या दलित समाजाच्या वेदनामय जीवनाचा आणि त्यातील दैन्याचा परामर्श या प्रकरणात घेतला आहे. दलित कादंबरीतील समाजचित्रे टिपत असताना त्यातील भुकेचे, अस्पृश्यतेचे चित्र वास्तवतेच्या कसोटीवर जिवंत व अत्यंत पारदर्शी वाटते. रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांचे दु:ख जिवंतपणे चित्रित करण्यासाठी दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा प्राणपणाने झटताना दिसतात. समाजाच्या अत्यंत खालच्या वर्गातील विदारक जीवनवास्तवातून या व्यक्तिरेखा आपले स्वत:चे असे स्वयंपूर्ण विश्व उभे करताना दिसतात.

दलित कांदबरीतील स्त्रीचे दु:ख दैन्य हे तर अत्यंत भयानक आहे. स्त्रियांवर होणारे अन्याय-अत्याचार, अगतिकता, औदासिन्य यांचाही या प्रकरणात परामर्श

घेतला आहे. दलित कादंबरीतील ग्रामीण जीवन, तेथील संस्कृती, रीतीरिवाज यांना स्पर्श करतानाच दलित कादंबरीतील वातावरण, निवेदनपद्धती, भाषाशैली, रचना यांचाही आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. दलित 'संघर्ष' हे साहित्याचे प्राणतत्त्व आहे. दलित कादंबऱ्यांमधील संघर्षाला संघर्षशील, कृतिशील विचारधारेची जोड असल्याचे दिसून येते.

दलित कादंबरीची वाटचाल पाहत असताना पहिल्या पिढीची वेदना, दुसऱ्या पिढीचा विद्रोह व तिसऱ्या पिढीचा बुद्धपुरस्कृत मानवतावाद यांच्या हाताला धरून ही कादंबरी समृद्ध होत गेली आहे याचा प्रत्यय येतो. अनादी काळापासून केवळ जिवंत राहण्यासाठी धडपडत असलेल्या दलिताच्या आयुष्यात 'स्वस्थता' हा प्रकारच नाही. त्यातून सतत नैराश्य पाठीशी लागलेले. अशा जीवघेण्या कैचीत सापडलेल्या दलित लेखकाला कादंबरीसारखा वाङ्मयप्रकार हाताळणे मोठे आव्हान आहे. आणि म्हणूनच दलित कादंबऱ्यांची संख्या पर्यायाने दलित साहित्यात कमी दिसते. असे असले तरी एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर मात्र दलित कादंबरीने संघर्षशील प्रेरणेने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यास सुरवात केली आहे.

# संदर्भसूची


१. का. बा. मराठे — ''नावल आणि नाटक याविषयी निबंध'' मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे १९६२

२. यशवंत दाते – चिंतामणी कर्वे — ''महाराष्ट्र शब्दकोश'' विभाग दुसरा, प्रकाशक – ह. आ. भावे (वरदा बुक्स, पुणे) पहिली आवृत्ती – १९३३ पृष्ठ – १६७८

३. "Encyclopaedia Britannica" L. T. D. William Benon, Publisher London 1768 Page No. 572

४. प्र. वा. बापट आणि ना. वा. गोडबोले — ''मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास'' व्हिनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती–१९७३ पृष्ठ – ३७

५. कुसुमावती देशपांडे — ''मराठी कादंबरीचे पहिले शतक' मराठी साहित्य संघ, मुंबई. दुसरी आवृत्ती– १९७५, पृष्ठ १६

६. भालचंद्र नेमाडे — ''टीकास्वयंवर'' संकेत प्रकाशन, पहिली आवृत्ती, सप्टेंबर १९९०, पृष्ठ १९८

७. मुन्शी प्रेमचंद — ''साहित्य का उद्देश'' हंस प्रकाशन, इलाहाबाद–१९५४ पृष्ठ ५४

८. प्रा. रा. ग. जाधव — मराठी विश्वकोश खंड ३ संपादक – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, म. रा. सा. संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती – १९७६ पृष्ठ ६००

९. डॉ. स्वाती कर्वे — ''लघुकादंबरीची संकल्पना व मराठी लघुकादंबरी'' अप्रकाशित पी. एच. डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे.
पृष्ठ ६८.

१०. डॉ. स्वाती कर्वे — उनि.
पृष्ठ ६८

११. भालचंद्र नेमाडे — कादंबरी
''मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप''
संपादक : गो. मा. पवार, म.द. हातकणंगलेकर
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – १९८६, पृष्ठ २३

१२. डॉ. भालचंद्र फडके — ''दलित साहित्य : वेदना व विद्रोह''
श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती – १९७७
पृष्ठ – ११४

१३. डॉ. भालचंद्र फडके — उनि.
पृष्ठ – ६८

१४. बाबुराव बागूल — 'सूड'
अभिनव प्रकाशन, मुंबई. प्रथमावृत्ती : १९७०
पृष्ठ –२८

१५. भि. शि. शिंदे — 'अमृतनाक'
मयूर प्रकाशन, पुणे – १९८०
पृष्ठ –

१६. अ. श्री. लोखंडे — 'निष्ठा'

१७. मुरलीधर जाधव — 'कार्यकर्ता' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
प्रथमावृत्ती – १९८४
पृष्ठ – ७२

१८. बळवंत कांबळे — 'नापत'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८४
पृष्ठ – २३

१९. अशोक व्हटकर — 'मेलेलं पाणी'
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
प्रथमावृत्ती– १९८४
पृष्ठ –

२०. डॉ. भालचंद्र फडके — 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह'
श्रीविद्या प्रकाशन, पुणे
प्रथमावृत्ती १९७७
पृष्ठ – १८७

२१. शंकरराव खरात — 'हातभट्टी'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती १९७०
पृष्ठ ६४

२२. बाबुराव बागूल — महाड साहित्य संमेलन १९७१ अध्यक्षीय भाषण
''दलित साहित्य : वेदना व विद्रोह''
भालचंद्र फडके, पृष्ठ – १९

२३. केशव मेश्राम — 'हकिकत व जटायू'
पी. पी. एच. बुक स्टॉल, मुंबई.
प्रथमावृत्ती १९७२, पृष्ठ ५२

२४. केशव मेश्राम — उनि.
पृष्ठ ७०

२५. डॉ. सुशीला ढगे
''मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल''
सुगावा प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती जून २००४
पृष्ठ १९१

२६. बाबुराव बागूल
'सूड'
अभिनव प्रकाशन, मुंबई
प्रथमावृत्ती १९७०
पृष्ठ १३

२७. बाबुराव बागूल
'सूड'
उनि
पृष्ठ ५९

२८. शंकरराव खरात
'गावचा टिनोपाल गुरूजी'
इनामदार बंधु प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती १९७१
पृष्ठ ९३

२९. शंकरराव खरात
उनि.
पृष्ठ ३५

३०. वा. ल. कुलकर्णी
'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या'
आनंद यादव यांच्या ग्रंथातील मुलाखत
पृष्ठ ९६

३१. शंकरराव खरात
'हातभट्टी'
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
प्रथमावृत्ती – १९७०
पृष्ठ २३

३२. शंकरराव खरात
उनि.
पृष्ठ –३६

३३. श्री. न. गजेंद्रगडकर — 'भाषा आणि भाषाशास्त्र'
व्हिनस प्रकाशन, दुसरी आवृती १९७९
पृष्ठ – ६४

३४. ना. गो. कालेलकर — 'भाषा आणि संस्कृत'
मौज प्रकाशन, पुणे
दुसरी आवृत्ती – १९८२
पृष्ठ –

३५. डॉ. भालचंद्र नेमाडे — 'टीकास्वयंवर'
संकेत प्रकाशन – १९९०
पृष्ठ – १९८

३६. डॉ. दिलीप धोंगडे — शैलीमीमांसा (सिद्धांत आणि उपयोजन)
शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर
जुलै २००१, पृष्ठ २५

३७. डॉ. दिलीप धोंगडे — उनि.
पृष्ठ २५

३८. शरणकुमार लिंबाळे — 'भिन्नलिंगी'
प्रकाशक : नंदिनी तु. गवळी,
सम्राटनगर, सागरमाळ, कोल्हापूर,
१९९१, पृष्ठ ३१

३९. माधव कोंडविलकर — 'अनाथ'
दिनपुष्प प्रकाशन, गिरगाव, मुंबई
डिसेंबर १९८१
पृष्ठ १६८

४०. सदा कऱ्हाडे — 'तप्तमुद्रा'
स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद
जून २००१, पृष्ठ ६६–६७